रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ७६
www.ramprahar.com
◆ शनिवार, ३ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
बचत गटांनी केली १५ कोटी ७५ लाखांची उलाढाल/२
आमदार चित्राताई बनल्या अंगणवाडी सेविका/५
भारतीय बॉक्सर्सचा 'गोल्डन' पंच!/८

## भारतीय महिला हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकले



**मकाकामिगाहारा :** जपानमधील काकामिगाहारा येथे पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अत्यंत रोमहर्षक महिला हॉकी अंतिम सामन्यात भारताने चीनचा १-०ने पराभव करत ऐतिहासिक सुवर्णपदक आपल्या नावे केले. या विजयासह भारतीय महिला संघाने तब्बल ४४ वर्षांची मोठी प्रतीक्षा संपवली असून १९८२मधील सुवर्णपदकाच्या सुवर्णक्षणांची पुनरावृत्ती केली आहे. यंदाच्या अंतिम सामन्यात भारतासमोर गतविजेता आणि एफआयएच रँकिंगमध्ये उच्च स्थान असलेला बलाढ्य चीन संघ होता. सामन्याच्या सुरुवातीलाच वाहतूक कोंडीमुळे भारतीय संघ नियोजित वेळेच्या अवघ्या १५ मिनिटे आधी मैदानावर पोहोचला होता, ज्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते, मात्र या सर्व अडथळ्यांवर मात करत भारतीय खेळाडूंनी मैदानात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत यश संपादन केले.

# सीजेपीचे आंदोलन अराजकतावादी!

### मंत्री आशिष शेलार यांनी घेतला समाचार

**मुंबई : प्रतिनिधी**

मतदार यादीच्या विशेष सखोल पडताळणीची (एसआयआर) प्रक्रिया निवडणूक आयोगाने निश्चित कार्यपद्धतीनुसार जाहीर केली असून राजकीय पक्ष तसेच नागरिकांना त्याबाबतची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे एसआयआरच्या नावाखाली आंदोलन करण्याला कोणतेही घटनात्मक अधिष्ठान नसल्याची टीका राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी शुक्रवारी (दि.२) केली. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. 'आंदोलनजीवी सीजेपीचे आंदोलन म्हणजे अराजकतेचे व्याकरण आहे', असे त्यांनी यावेळी म्हटले.

पत्रकार परिषदेस भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे आणि सहमाध्यमप्रमुख ओमप्रकाश चौहान उपस्थित होते. मंत्री शेलार पुढे म्हणाले, निवडणूक आयोगाने एसआयआरचा संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला असून त्याची कार्यपद्धतीही स्पष्ट केली आहे. सर्व राजकीय पक्षांना या प्रक्रियेची माहिती देण्यात आली आहे. अर्ज, दावे-हरकती, सुनावणी तसेच आवश्यक कागदपत्रांबाबतची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांनाही त्याची माहिती देण्यात आली आहे. असे असताना काही राजकीय



पक्ष आणि संघटना आंदोलनाची भूमिका का घेत आहेत?

एखाद्या प्रक्रियेबाबत आक्षेप असल्यास तो घटनात्मक आणि कायदेशीर मार्गाने मांडता येतो. निवडणूक आयोगासमोर आपली बाजू मांडण्याची संधी असून न्यायालयीन मार्गही उपलब्ध आहे. या संस्थात्मक प्रक्रिया उपलब्ध असताना आंदोलनाच्या माध्यमातून वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न का केला जात आहे, असा प्रश्न मंत्री शेलार यांनी उपस्थित केला. एसआयआरच्या माध्यमातून कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाऊ नये यासाठी आवश्यक प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. एखाद्या मतदाराच्या नावाबाबत आक्षेप असल्यास संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते. त्यामुळे लाखो प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या निवडणूक प्रक्रियेबाबत जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांनी करू नये, असे ना. शेलार यांनी सुनावले. **(पान २ वर..)**



## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या नाट्यसंहितेचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पूजन

### 'ही परी अस्मानीची' राज्य नाट्य स्पर्धेत होणार सादर

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे यंदाच्या ६५व्या राज्य नाट्य स्पर्धेसाठी 'ही परी अस्मानीची' या नाटकाची निवड करण्यात आली आहे. या नाटकाच्या संहितेचे पूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पत्रकार संघाच्या सभागृहात करण्यात आले.

मुंबई मराठी पत्रकार संघाने राज्य नाट्य स्पर्धेच्या माध्यमातून रंगभूमीवरील आपला प्रवास पुढे सुरू ठेवला असून यंदा संघाचे हे दुसरे नाटक राज्य नाट्य स्पर्धेत सादर होणार आहे. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, विश्वस्त व नाटकातील अभिनेते देवदास मटाले, उपाध्यक्ष व अभिनेत्री स्वाती घोसाळकर, नाट्यदिग्दर्शक गुरुदत्त लाड, उपाध्यक्ष राजेंद्र हुंजे, कार्यकारिणी सदस्य रजनीश राणे आणि विनोद साळवी उपस्थित होते.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पहिल्या नाटकाच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पहिल्या नाटकाच्या संहितेचे पूजनही माझ्या हस्ते झाले होते आणि त्या नाटकाने राज्य नाट्य स्पर्धेत दोन पुरस्कार मिळवले होते. त्यामुळे त्या नाटकाच्या यशस्वी वाटचालीच्या आठवणी आजही कायम आहेत. यंदाच्या 'ही परी अस्मानीची' या नाटकाकडून आणि त्यातील कलाकारांकडून त्याहून अधिक चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे.

रंगभूमी हे समाजमनाशी संवाद साधणारे प्रभावी माध्यम असून पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न आणि घडामोडी मांडणाऱ्या पत्रकारांनी सांस्कृतिक क्षेत्रातही आपला ठसा उमटविणे ही कौतुकाची बाब असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नमूद केले. नाटकाच्या माध्यमातून कलाकारांना आपल्या कलागुणांना वाव देण्याची संधी मिळते. राज्य नाट्य स्पर्धेसारख्या प्रतिष्ठेच्या व्यासपीठावर मुंबई मराठी पत्रकार संघाने आपले नाटक सादर करावे, ही आनंदाची बाब आहे, असे सांगत या नाटकातील सर्व कलाकार, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

पत्रकारिता आणि सांस्कृतिक चळवळ यांची सांगड घालत मुंबई मराठी पत्रकार संघ विविध उपक्रम राबवत असल्याचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी सांगितले. राज्य नाट्य स्पर्धेतील मुंबई मराठी पत्रकार संघाचे हे दुसरे नाटक आहे. पहिल्या नाटकाला मिळालेल्या यशाची परंपरा कायम राखत 'ही परी अस्मानीची' हे नाटकही सर्व कलाकार तितक्याच ताकदीने सादर करतील, असा विश्वासही चव्हाण यांनी व्यक्त केला.

## रोटरी क्लबच्या पैठणी महोत्सवाचे उद्घाटन

### आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने सोनी पैठणी महोत्सवाचे भव्य आयोजन शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उदघाटन भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि.२) झाले.

उद्घाटन समारंभास महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, रोटरी क्लब डिस्ट्रीक्ट गव्हर्नर नितीन ढमाले, नगरसेवक प्रथमेश सोमण, रोटेरियन डॉ. गिरीश गुणे, डॉ. अमोद दिवेकर, डॉ. पटेल, पनवेल क्लब अध्यक्ष दीपक गडगे, नेहल ठक्कर चंद्रन आदी मान्यवर उपस्थित होते. तब्बल १७० वर्षांची देदिप्यमान परंपरा असलेल्या या महोत्सवामध्ये महिलांसाठी अस्सल येवला आणि नाशिकच्या रेशमी पैठणी साड्यांचा विशेष खजिना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या या स्तुत्य उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. रोटरी क्लबच्या माध्यमातून सातत्याने समाजोपयोगी कामे केली जातात. या सामाजिक कार्याला हातभार लावण्यासाठी तसेच पैठणी परंपरेचा आनंद घेण्यासाठी पनवेलकरांनी या महोत्सवाला जास्तीत जास्त संख्येने भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. **(पान २ वर..)**

## आळंदी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आळंदी : प्रतिनिधी**

आळंदी येथील विनर्स अकॅडमी या खासगी कोचिंग क्लासच्या आठ विद्यार्थ्यांचा गुरुवारी दिवेआगर येथील समुद्रात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. दिवंगत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शुक्रवारी (दि. २) आळंदी शहरासह लगतच्या चऱ्होली खुर्द परिसरात १०० टक्के कडकडीत बंद पाळण्यात आला.

दरम्यान, आळंदी नगर परिषदेने केलेल्या तपासणीदरम्यान विनर्स अकॅडमीने व्यवसाय परवाना अथवा ना-हरकत प्रमाणपत्र न घेतल्याचे निष्पन्न झाले आहे.

## निवडक

### अभिनेता डिनो मोरियाची चौकशी

**मुंबई :** मिठी नदीतील गाळ उपसा आणि सफाईच्या कामातील आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी अभिनेता डिनो मोरिया याची मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी (दि.२) चौकशी केली. मिठी नदीतील गाळ उपशाच्या कामांमध्ये सुमारे ६५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. यातील प्रमुख आरोपी केतन कदम याच्याशी मोरियोचे संबंध असल्याचे समजते.

### महेंद्र हरपाळकर यांची बदली

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आश्वासन पाळत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या बदलीचा निर्णय घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून शुक्रवारी (दि.२) या संदर्भातील आदेश काढले.

## रायगडचे समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलले



**अलिबाग : प्रतिनिधी**

सलग तीन दिवस पर्यटनासाठी लोक कुटुंबासह बाहेर पडले आहेत. पर्यटकांनी विशेषकरून अलिबागला पसंती दिली. त्यामुळे अलिबाग शहर आणि आसपासच्या परिसरातील हॉटेल, ग्रामीण भागातील कॉटेजेसची बुकिंग फुल्ल झाली आहे. दरम्यान, शुक्रवारी (दि. २) जिल्ह्यातील समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलले होते.

महात्मा गांधी जयंती आणि त्याला लागून शनिवार, रविवार सुट्टीचे दिवस असे सलग तीन दिवस शाळा-महाविद्यालये, शासकीय-निमशासकीय कार्यालयांना सुट्टी आहे. त्यामुळे लोक पर्यटनासाठी बाहेर पडले आहेत. मुंबई, पुणे, ठाणे या शहरांपासून जवळ असल्यामुळे पर्यटकांनी अलिबागला पसंती दिली आहे. त्यांनी काही दिवसांपूर्वीच अलिबाग शहर तसेच आसपासच्या परिसरातील हॉटेल्स् आणि कॉटेजेस् आरक्षित केले आहेत.

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथे गुरुवारी पुणे जिल्ह्याच्या आळंदीतील आठ विद्यार्थांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर समुद्रकिनाऱ्यावर गर्दी कमी असेल असे वाटले होते, मात्र सुट्टीत पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक समुद्र किनाऱ्यांवर आले आहेत. अलिबागबरोबरच जिल्ह्यातील इतर समुद्रकिनाऱ्यांवरदेखील पर्यटकांची गर्दी आहे.

मुंबईहून सागरी सफर करीत अलिबागला पोहचता येते. तिथून पुढे रायगडमधील अन्य ठिकाणी जाता येते. या प्रवासाची गंमत वेगळी आहे . त्यामुळे पर्यटक समुद्र सफारीचा आनंद घेण्यासाठी जलवाहतुकीचा पर्याय निवडत आहेत.

अलिबागसह मांडवा, आवास, किहिम, वरसोली, आक्षी, नागाव, काशीद, मुरूड, दिवेआगार, श्रीवर्धन, हरिहरेश्वर किनाऱ्यांवर पर्यटकांनी गर्दी आहे.

## उष्णतेचा इशारा

**मुंबई :** ऑक्टोबरआरंभीच कोकणात उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. पुढील तीन दिवस मुंबईसह संपूर्ण कोकण प्रदेशात उष्ण व दमट वातावरणाचा 'यलो अलर्ट'चा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी उष्ण व दमट वातावरणाचा 'यलो अलर्ट' आहे.

## भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू

**वर्धा :** नवरात्रोत्सवासाठी शेगाव येथून दुर्गामूर्ती घेऊन वर्ध्याकडे परतणाऱ्या मंडळातील सदस्यांच्या वाहनाला समृद्धी महामार्गावर शुक्रवारी (दि.२) मध्यरात्री दोनच्या सुमारास भरधाव ट्रकने मागून जोरदार धडक दिली. धामणगाव-पुलगावदरम्यान झालेल्या या भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाला असून २२ जण जखमी झाले आहेत.

ही सर्व मंडळी २८ सप्टेंबरला शेगावला पोहचली होती, तर ३० रोजी त्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला. सोबत मूर्ती असल्याने पीकअप वाहन आणि ट्रॉली संथ गतीने येत होती. जवळ पोहचत असतानाच अजस्त्र ट्रक या गाडीला वेगात येऊन धडकला. या अपघातात पाच जणांचा जागीच, तर दोघांचा रुग्णालयात मृत्यू झाला. याशिवाय २२ जण जखमी झाले असून त्यापैकी तिघे गंभीर आहेत. जखमींवर उपचार सुरू आहेत.






# बचत गटांनी केली १५ कोटी ७५ लाख रुपयांची उलाढाल

## १ लाख ५७ हजार ६१२ गणेशमूर्तींची विक्री

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या पुढकारातून उमेद अभियानांतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. गणेशोत्सवात जिल्ह्यातील सुमारे २४७ बचतगटातील महिलांनी १ लाख ५७ हजार ६१२ गणपतीमूर्तींची विक्री केली आहे. यातून तब्बल १५ कोटी ७४ लाख ५९ हजार रुपयांची उलाढाल झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, रेखीव डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना खास ओळख प्राप्त झाली असून,



गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील महिला बचतगटही उतरले आहेत. या व्यवसायासाठी 'उमेद' अभियानामार्फत महिला बचतगटांना फिरता निधी तसेच ग्रामसंघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात येतो.

*रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या पुढकारातून उमेद अभियानांतर्गत गणेशमुर्तीची विक्री करण्यात आली*

**तालुकानिहाय विक्री केलेल्या मूर्तींची संख्या आणि एकूण उलाढाल**

| | | |
|---|---|---|
| अलिबाग | ३२८ | ७८१००० रु. |
| कर्जत | ६१४ | १३४३००० रु. |
| खालापूर | ९५० | १९७५००० रु. |
| महाड | ७० | १७५००० रु. |
| माणगाव | २१२५ | ३४७५००० रु. |
| मुरुड | २०६० | ३३६५००० रु. |
| पनवेल | १८० | ५००००० रु. |
| पेण | १४९५०५ | १४२७५५००० रु. |
| रोहा | १९५ | ३९०००० रु. |
| श्रीवर्धन | २४० | ४६०००० रु. |
| सुधागड | ६०० | ८००००० रु |
| तळा | १५० | २८०००० रु. |
| उरण | ५९५ | ११६०००० रु. |

# छत्रपती संभाजी महाराजांच्या राजमुद्रा स्मारकाचे रोह्यात लोकार्पण

## खासदार सुनील तटकरेंच्या हस्ते सोहळा

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे जाज्वल्य इतिहास आहे. सर्व धर्मीयांना सोबत घेत छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्य निर्माण केले. जगाच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज नाव घेतले जाते.स्वराज्य रक्षक, धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य मोठे होते.रोहयात छत्रपती संभाजी महाराजांचे राजमुद्रा स्मारकाचे लोकार्पण होत आहे. याचे मला अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य मनात घेत नागरीकांच्या पायभुत सुविधा देण्याचे काम करायचे आहे. जाज्वल्य इतिहास शौर्याची स्फुर्ती घेत भविष्यात काम करायचे आहे. रोह्यात शिवकालीन, इतिहास कालीन वैभाव साकारत आहोत. असे सांगत खा.सुनील तटकरे यांनी आ.रविंद्र पाटील,मा.खा. धैर्यशील पाटील यांच्या संमतीने रोह्याच्या बरोबरीने पेणचा विकास करणार असे सांगितले.

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील मेहेंदळे हायस्कूल समोरील जागेत माजी राज्यसभा सदस्य श्री धैर्यशील मोहन पाटील यांच्या निधीतून खासदार स्थानिक विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत छत्रपती संभाजी महाराज उद्यानाचे लोकार्पण खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या लोकार्पण प्रसंगी खा.सुनील



तटकरे बोलत होते.

या कार्यक्रमास माजी खा. धैर्यशील पाटील, आ. अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, राष्ट्रवादी तालुका कार्याध्यक्ष समिर शेडगे, भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग, शहर अध्यक्ष सुमीत रिसबूड, सभापती राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, महेंद्र दिवेकर, रवींद्र चाळके, महेंद्र गुजर, रोशन चाफेकर, गौरी बारटक्के, प्रियांका धनावडे, प्रशांत कडु, दिवेश जैन,माज सवाल, श्रध्दा घाग यासह नगरसेवक, नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी व रोहा अष्टमीकर नागरिक आदी उपस्थित राहणार आहेत.

यावेळी माजी खा. धैर्यशील पाटील यांनी वडीलांचा सुंदररित्या वारसा छत्रपती संभाजी महाराज यांनी पुढे नेला आहे. विद्यार्थ्यांना प्रेरणामिळावी म्हणुन शाळा महाविद्यालयाचे पुढे छत्रपती संभाजी महाराज उद्यान व राजमुद्राचे स्मारक करण्यात आले आहे. सुसंस्कृत राजा, सुशिक्षित राजा, लेखणी, धारधार तलवार बाजी असणारा राजा छत्रपती संभाजी महाराज होते. छत्रपती संभाजी महाराजांचा दरारा मोठा होता.त्यांची मोठी ताकत होती. दैदिप्यमान राजा छत्रपती संभाजी महाराज होते. त्यांची प्रेरणा घेत मराठे पुढे लढले. असे सांगितले.

यावेळी प्रास्ताविकात वनश्री शेडगे यांनी मा.खा. धैर्यशील पाटील यांच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज यांचे नावाने असलेले उद्यान भविष्यात प्रेरणादायी ठरणार आहे.खा.सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून व ना.अदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांच्या पुढाकाराने सर्वात मोठा छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा रोह्यात उभा आहे. अनेक शिल्प रोह्यात उभे राहत असून हे इतिहासाचे जागर ठरणार आहे.यावेळी खा.सुनील तटकरे, ना.आदीती तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून रोहा शहरात विविध विकास कामे होत असल्याने त्या कामाची माहीती यावेळी वनश्री शेडगे यांनी दिली.

# डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सहयोगाने विशेष स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

'सेवा संकल्प अभियाना'मध्ये लोकोपयोगी विविध उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये स्वच्छता मोहीमा हादेखील एक महत्वाचा उपक्रम आहे. त्यानुसार डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सर्व श्रीसदस्यांमार्फत स्वच्छता ही ईश्वरी पूजा मानून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व २९ गावठाणांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली व या माध्यमातून स्वच्छतेची लोकचळवळ उभी रहात असल्याचा आनंद उपमहापौर दशरथ भगत यांनी व्यक्त केला.



व प्रत्येक नागरिकाने त्यात सेवा कर्तव्य भावनेने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत 'एक दिवस एक साथ एक तास' या अभिनव संकल्पनेस अनुसरून आज महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने महापालिका क्षेत्रातील सर्व गावठाणांमध्ये महास्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्राधान्याने डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवंदडा, अलिबाग यांच्या आदेशानुसार २ हजारहून अधिक श्रीसदस्यांनी स्वयंस्फुर्तीने सहभाग घेतला.

वाशीगाव येथील प्रेमनाथ पाटील चौक स्वच्छता मोहीमेत उपमहापौर श्री.दशरथ भगत व आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी गाव-गावठाण परिसर स्वच्छतेत सहभाग घेतला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, नगरसेवक निशांत भगत, मालमत्ताकर विभागाचे उपआयुक्त डॉ.अमोल पालवे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, वाशी विभागाचे सहा.आयुक्त सुखदेव येडवे, मुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर व इतर अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. इतरही गावठाण भागात प्रभाग समिति अध्यक्ष ललिता मढवी, नगरसेविका सरोज पाटील, भारती कोळी, गंगाताई पाटील, अंजना म्हात्रे, ममित चौगुले यांनी सहभाग घेतला.

# ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ल्याच्या निधीचा मार्ग मोकळा!

## जिल्हा नियोजन मंडळातून दोन कोटी रुपये पुरातत्व खात्यास होणार वर्ग

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहराच्या अगदी चार किलोमीटर अंतरावर ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ला आहे. जंजिरा किल्ला जिंकता यावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधला होता. ऐतिहासिक महत्व असणारा व समुद्राच्या मध्यभागी असणाऱ्या या किल्ल्याची वास्तविक पाहणी खासदार सुनील तटकरे यांनी स्वतः केली होती व त्याच वेळी त्यांनी शब्द दिला होता की या किल्ल्याची दुरुस्ती वेळीच केली जाईल. त्याप्रमाणे खासदार सुनील तटकरे यांनी त्वरित दोन कोटी रुपये किल्ल्यासाठी जिल्हा नियोजन मंडळातून दिले होते.

काही तांत्रिक अडचणीमुळे हे पैसे वित्तरीत झाले नव्हते या बाबतची सविस्तर माहिती खासदार तटकरे



यांनी घेऊन नुकत्याच झालेल्या जिल्हाधिकारी कार्यालयात राजस्व सभागृहात सर्व शासकीय अधिकारी व पुरातत्व अधिकारी यांना बोलावण्यात येऊन जिल्हा नियोजन मंडळातून वितरीत झालेले दोन कोटी रुपये पुरातत्व खात्यास वर्ग का होत नाहीत याची त्यांनी विचारणा करून असणारी समस्या अधिकारी वर्गाने तातडीने दूर करून जिल्हाधिकारी यांनी त्वरित दोन कोटी रुपये पुरातत्व खात्यास वर्ग करावे असे आदेश दिले.

खासदार सुनील तटकरे यांनी आदेश दिल्यामुळे किल्ल्याच्या विकासासाठी असणारा निधी प्राप्त झाल्याने पद्मदुर्ग किल्ल्याचा विकास होणार हे आता अधोरेखित झाले आहे. यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, मुरुड हे पर्यटन स्थळ असून येथे वर्षाला लाखो पर्यटक येत असतात. ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याप्रमाणेच पद्मदुर्ग किल्ल्याच्या विकास होणे खूप गरजेचे आहे. मी स्वतः या किल्ल्याची पाहणी केली असून या किल्ल्याची डागडुजी करणे खूपच आवश्यक आहे. सदरचा किल्ला सुशोभित व पर्यटक यांना सहज जाता येता आले तर पर्यटकांची संख्या वाढणार आहे. लवकरच जिल्हा नियोजन मंडळाकडून हे पैसे पुरातत्व खात्यास वर्ग केले जातील व खऱ्या अर्थाने पद्मदुर्ग किल्ल्याची दुरुस्तीचे काम वेगात सुरू होईल असा विश्वास यावेळी खासदार तटकरे यांनी व्यक्त केला आहे.पद्मदुर्ग किल्ल्यावर पर्यटक यांना सहज चढता व उतरता यावे यासाठी मांडवा बंदरावर असणारी तरंगती जेटीसाठी लागणारा वाढीव निधी सुद्धा आपण लवकरच पूर्तता करणार असल्याचे यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

# सीबीडीतील उद्यानाचा होणार कायापालट



**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी बेलापूर सेक्टर-६ येथील कै. सरदार कुलवंत सिंग सिद्धू उद्यानातील जॉगिंग ट्रॅकच्या सुशोभीकरण कामाचा शुभारंभ सभागृह नेते सागर नाईक यांच्या हस्ते २ ऑक्टोबर रोजी करण्यात आला.

एक कोटी रुपयांचे हे काम असून, या सुशोभीकरणात जॉगिंग ट्रॅक, ओपन जिम, योगा सेंटर तसेच शोभिवंत रोपे, हिरवळीचे पट्टे तयार करण्यात येणार आहेत. हे सुसभोकरण पूर्ण झाल्यावर नागरिकांना मनोरंजनाचे हक्काचे ठिकाण उपलब्ध होणार आहे.साऊंड बॅरियर उभारण्याचा प्रस्तावही अंतिम टप्प्यात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी नगरसेविका स्वाती गुरखे, नगरसेविका सुरेखा नरबागे, नगरसेवक कुलदीपसिंग सूरी, माजी नगरसेवक अशोक गुरखे, डॉ. जयाजी के. नाथ चॅरिटेबल फाउंडेशनचे अध्यक्ष धनंजय नाथ, समाजसेवक अशोक नरबागे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

# सीजेपीचे आंदोलन अराजकतावादी!

'जिथे विरोधक जिंकतात तिथे निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात नाही. भाजप जिंकला की मात्र यांचा पोटशूळ उठतो,' अशी टीका मंत्री शेलार यांनी केली. स्वतःचा अजेंडा राबविण्यासाठी राजकीय हेतूने उभे करण्यात आलेले आंदोलन शिवाजी पार्कवर करण्याचा प्रयत्न हा असंविधानिक असल्याचे ते म्हणाले. आंदोलनजीवी सीजेपीच्या माध्यमातून जनतेला कदापि न्याय मिळणार नाही,' असेही त्यांनी स्पष्ट केले. लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र आंदोलनाच्या माध्यमातून घटनात्मक संस्थांबद्दल अविश्वास निर्माण करणे योग्य नाही. एसआयआर प्रक्रियेबाबत आक्षेप असल्यास ते मांडावेत, पण त्यासाठी उपलब्ध घटनात्मक प्रक्रियेचा अवलंब करावा, असे आवाहन ना. शेलार यांनी केले.

# रोटरी क्लबच्या पैठणी महोत्सवाचे उद्घाटन

महाराष्ट्राची संस्कृती आणि सौंदर्य जपणाऱ्या पैठणी साड्यांची ही मोठी परंपरा एकाच छताखाली अनुभवण्याची संधी या महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना आणि विशेषतः महिलावर्गाला आहे. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रमांची साखळी जपतानाच या पारंपरिक कला-संस्कृतीला आणि विणकरांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

तीन दिवस सुरू असणाऱ्या या महोत्सवात विविध डिझाईन्स, आकर्षक रंगसंगती आणि उत्कृष्ट सिल्क दर्जाच्या पारंपरिक तसेच आधुनिक पैठणी साड्यांचे भव्य प्रदर्शन आणि विक्री सुरू असून पनवेल व आसपासच्या परिसरातील नागरिकांनी या पैठणी महोत्सवाला आवर्जून भेट देऊन या कलावैभवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



# सेवा सप्ताहाच्या माध्यमातून स्वच्छतेला प्राधान्य -नगराध्यक्ष प्रितम पाटील

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील गणेशोत्सव सुरळीतपणे पार पडल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी पेण पालिकेच्या माध्यमातून भोगावती नदीवर असणाऱ्या विसर्जन घाटाची आणि परिसराची पेण नगरपरिषदेच्या माध्यमातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानाबाबत बोलताना पेण पालिकेच्या नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह राबविला जात आहे त्या सप्ताहाच्या माध्यमातून स्वच्छतेला प्राधान्य देत आम्ही आजचा हा उपक्रम राबवित आहोत असे सांगितले.

या अभियानाला त्यांच्या सोबत महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील, कर व शुल्क सभापती सुनीता जोशी, बांधकाम सभापती आनंद जाधव, नगरसेवक निळकंठ म्हात्रे,नगरसेविका जास्मिन पाटील, सुजाता डाकी, मुख्याधिकारी जीवन पाटील, आरोग्य अधिकारी दयानंद गावंड,



बांधकाम रचनाकार सुहास कांबळे, प्रशासन अधिकारी गणेश सिंग ठाकूर, विश्वनाथ गायकवाड,नरेंद्र पाटील, प्रवीण बैकर,पालिका कर्मचारी आणि सफाई कर्मचारी उपस्थित होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी या वाढदिवसानिमित्त संपूर्ण देशभरात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत " स्वच्छता ही सेवा "या ब्रीदवाक्याच्या माध्यमातून सेवा सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहाचा एक भाग म्हणून गणेशोत्सव पार पडल्यानंतर पेण शहरातील भोगावती नदीवरील विसर्जन घाटावर मागील पंधरा दिवसांत जो कचरा साठला होता तो साफ करण्याचा संकल्प करून हा सेवा सप्ताह पार पडण्यात आला.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी स्वच्छता ही सेवा आहे हे लक्षात घेऊन आम्ही स्वच्छता अभियानात सहभागी होऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आगळ्या वेगळ्या शुभेच्छा दिल्या आहेत. पर्यावरण हेच खऱ्या अर्थाने माणसाचे निरोगी जीवन आहे आणि हे पर्यावरण संतुलित राहायला पाहिजे.

## दुखवटा

### प्रा .दीपक डफळापूरकर



**मुरुड :** येथील सर एस.ए. ज्युनियर कॉलेजचे सेवानिवृत्त शिक्षक दीपक रघुनाथराव डफळापूरकर (वय ६७ वर्षे) यांचे (सांगली) येथे दि .१ ऑक्टोबर रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी , २ मुलगे , सुन , नातवंडे असा परिवार आहे .

### लक्ष्मीबाई ठाकूर



**उरण :** तालुक्यातील बोकडविरा येथील लक्ष्मीबाई दामोदर उर्फ चंद्राबाय ठाकूर(९४) यांचे गुरुवारी उपचारा दरम्यान मुंबईत निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवारी बोकडविरा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या बोकडविरा ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य होत्या. त्यांच्यामागे मूले, मुली,सुना, नातवंडे,पतवंडे असा मोठा परिवार आहे.

### तानुबाई इंदलकर



**नवी मुंबई :** नवी मुंबई नेरुल येथिल ज्येष्ठ शिवसैनिक सुभाष इंदलकर यांच्या मातोश्री तानुबाई अर्जुन इंदलकर (आक्का), वय ९० वर्षे यांचे बुधवार, ३० सप्टेंबर रोज़ी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर मुक्काम पोस्ट कळंबे, तालुका जिल्हा सातारा या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# स्वच्छता ही सेवा अभियान

## खारघर, रोडपाली, तळोजा आणि कामोठे येथे विशेष स्वच्छता मोहीम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत 'एक दिवस, एक तास, एक साथ' या संकल्पनेनुसार गुरुवारी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर, रोडपाली, तळोजा आणि कामोठे अशा विविध भागांत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, महापालिका अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतादूत आणि विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश दिला.

कामोठे व खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या कार्यक्रमाला महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, महापालिका आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती 'क' चे सभापती रवी जोशी, नगरसेवक विकास घरत, नगरसेविका हेमलता गोवारी, नगरसेवक प्रदीप भगत, नगरसेविका शीला भगत, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विभाग प्रमुख अनिल कोकरे आणि मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या मोहिमेत केएलई कॉलेज (कळंबोली), लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेज (खारघर), एमजीएम कॉलेज (कामोठे) आणि सीकेटी कॉलेज (खांदा कॉलनी) येथील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी प्रभाग समिती 'क' च्या सर्व स्वच्छतादूतांसोबत खांदेश्वर रेल्वे स्टेशन समोरील परिसराची स्वच्छता केली.

खारघर येथे राबवण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेत रामशेठ ठाकूर सेकंडरी अँड हायर सेकंडरी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन परिसर स्वच्छ केला. या वेळी खारघर प्रभाग समितीचे सभापती मधु पाटील व महापालिका सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रभाग समिती 'अ' अंतर्गत रोडपाली विभागातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये सेक्टर-१२ येथील हिंदू स्मशानभूमीत 'एक दिन, एक घंटा, एक साथ' श्रमदान अभियान पार पडले. उपमहापौर प्रमिला पाटील आणि प्रभाग समिती 'अ' चे सभापती रवींद्र भगत यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबवण्यात आले. या मोहिमेत नगरसेविका मनाली ठाकूर, बायजताई बारगजे, नगरसेवक राजेंद्र शर्मा, भाजप नेते रवीशेठ पाटील, अमर ठाकूर, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, अमोल कांबळे, दिग्नेश भोईर, पर्यवेक्षक हर्षद पाटील यांच्यासह प्रभाग क्र. ७, ८, ९ आणि १० मधील स्वच्छतादूतांनी सक्रिय सहभाग घेतला.

पनवेल महापालिका क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत व्यापक जनजागृती केली जात असून, नागरिकांनी या मोहिमेत सातत्य ठेवून आपला परिसर स्वच्छ व सुंदर ठेवावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# चिपळे येथे एका दिवसात दोन नवीन ट्रान्सफॉर्मर बसविले

## भाजप युवा मोर्चाच्या प्रयत्नांना यश; वीजपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिपळे परिसरातील वीजपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावत एका दिवसात दोन नवीन एमएसईबी ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या सहकार्याने पनवेल तालुका पूर्व मंडळ भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष विश्वजीत पाटील यांच्या पुढाकाराने पंचायत समिती उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्या तसेच चिपळे येथील संकेत गोविलकर यांच्या सहकार्याने हे काम तातडीने पूर्ण करण्यात आले.

चिपळे परिसरातील ट्रान्सफॉर्मर जळाल्यामुळे नागरिकांना वीजपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विश्वजीत पाटील यांनी संबंधित एमएसईबी अधिकारी तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्याशी तातडीने संपर्क साधून नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देण्यासाठी अथक प्रयत्न केले.

या पाठपुराव्याला यश मिळून अवघ्या एका दिवसात दोन नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून बसविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. डीवाय इंजिनियर श्री. म्हस्के तसेच एरिया इंजिनियर अविनाश कोकिटकर यांचे विशेष सहकार्य या कामाकरिता लाभले. याशिवाय महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी प्रदीप पाटील, भाऊसाहेब राठोड यांच्या सहकार्याने काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून वीजपुरवठा पूर्ववत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या कामासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शन व नेतृत्वाबद्दल तसेच चिपळे येथील विश्वजीत पाटील, संकेत गोविलकर यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल नागरिकांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्याचबरोबर नागरिकांच्या अडचणीची तातडीने दखल घेऊन सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल पाटील यांचे नागरिकांकडून आभारही मानण्यात आले.

नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून करण्यात आलेल्या या प्रयत्नाचे चिपळे परिसरातील नागरिकांनी स्वागत केले आहे.



# बनावट नंबर प्लेटचा वापर करून विनयभंग करणारा थार चालक पोलिसांच्या ताब्यात

**नवीन पनवेल :** बनावट नंबर प्लेटचा वापर करून तरुणीचा विनयभंग आणि अपघात करणाऱ्या थार चालक अली उर्फ तालीब हसन नखवी ला(रा. देवकी अपार्टमेंट, सेक्टर ५० सीवूड) अवघ्या दहा तासांच्या आत गुन्हे शाखा कक्ष तीन, पनवेलच्या पोलिसांनी ताब्यात घेतले.

खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत महिलेचा विनयभंग करून पळून जाणाऱ्या आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष तीन, पनवेल करत होते. वपोनि औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला. यावेळी तपासा दरम्यान लाल रंगाच्या थार गाडीचा सीसीटीव्ही फुटेजमध्ये वाहनाचा क्रमांक दिसून आला. त्या क्रमांकाची पडताळणी केली असता तो क्रमांक अन्य गाडीचा असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर उपलब्ध फुटेज आणि वेगवेगळ्या कॅमेऱ्यांचा पाठपुरावा आणि आरटीओ नोंदीनुसार लाल रंगाच्या ६२ नोंदणीकृत थार गाडीच्या माहितीची छाननी करण्यात आली. त्यानंतर आरोपी बोनकोडे गाव, कोपरखैरणे येथे सापडून आला. गुन्ह्यात वापरलेल्या गाडीचा क्रमांक एम एच २० एफ यु ३७५१ असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीवर यापूर्वी नेरूळ पोलीस ठाण्यात विनयभंग आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल आहे. आरोपीच्या अटकेमुळे खारघरमधील दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

# क्रेडिट कार्डद्वारे आर्थिक फसवणूक

**नवीन पनवेल :** क्रेडिट कार्डमधून एक लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात ३० सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. केशवलाल यादव हे कामोठे सेक्टर १८ येथे राहत असून आरोपीने त्यांना विश्वासात घेऊन नवीन आयसीआयसीआय बँकेचे क्रेडिट कार्ड मंजूर झाल्याचे सांगितले आणि बनावट लिंक आणि फाईलचा वापर करून त्यांच्या क्रेडिट कार्डमधून एक लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केली.

# फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** बनावट कागदपत्रे तयार करून सदनिका क्रेडिट सोसायटीकडे गहाण ठेवून गृह कर्ज स्वतःच्या बँक खात्यात घेतल्याप्रकरणी आरोपी विनोद खंडू डुंबरे (रा. सीता विष्णू सोसायटी, सेक्टर १९, कोपरखैरणे) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २८ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

बळीराम दत्तात्रय पाटील हे विचूंबे येथे राहत असून आरोपी विनोद खंडू डुंबरे यांनी तो सदनिका विक्री एजंट असल्याचे त्यांना सांगितले आणि ओमकार रेसिडेन्सी नेरेपाडा येथील उभारण्यात आलेल्या प्रोजेक्टमधील सदनिका विक्रीसाठी खरेदीदार शोधून देतो आणि बँकेकडून गृह कर्ज मंजूर करून घेतो असे सांगितले. आणि मंजूर झालेली गृह कर्जाची रक्कम स्वतःकडे पाठवण्यास सांगून बारा सदनिकेचे प्रति सदनिका सव्वा लाख रुपये प्रति महिना असे एकूण २० महिने देतो असे सांगून त्यांच्यासोबत समझोता करारनामा केला.

कराराप्रमाणे सांगली वैभव को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये बळीराम पाटील यांच्या आठ सदनीकेचे गृहकर्ज मंजूर करून गृह कर्जाची एकूण रक्कम एक कोटी ९७ लाख रुपये आरोपीने स्वतःच्या सानपाडा येथील बँक खात्यात स्वीकारले तसेच बळीराम पाटील यांच्या ओमकार एंटरप्रायजेसच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार केली आणि प्रोप्रायटर असल्याचे भासवून सदनिका गहाण ठेवल्या.

# मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम सादर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने 'स्वच्छोत्सव : स्वच्छता ही सेवा-२०२६' अभियानांतर्गत सफाई मित्र व सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी गुरूवार दि. १ ऑक्टोबर रोजी आद्य वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'स्वच्छता में सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' या यावर्षीच्या अभियानाच्या मुख्य संकल्पनेनुसार आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला सफाई कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमास पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व सफाई मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी स्वच्छ शहराच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.



पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा-२०२६' अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासोबतच स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याचा सन्मान करण्यावरही भर देण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर रात्रंदिवस शहर स्वच्छ करणाऱ्या स्वच्छता कर्मचारी वर्गासाठी विशेष सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये 'स्वामी इव्हेंट्स' प्रस्तुत संगीतकार अमिर हडकर निर्मित 'बँड मेजर ए' या संगीत कार्यक्रमातून मराठी-हिंदी चित्रपट गीते, लोकगीते, भावगीते, छत्रपती शिवाजी महाराज, बुद्ध-भीम गीते, नृत्य तसेच हास्याची बहारदार मेजवानी उपस्थितांना अनुभवता आली. सोनी मराठी वाहिनीवरील 'महाराष्ट्राची हास्य जत्रा' फेम संगीतकार अमिर हडकर, आर.जे. डी. महेश, झी मराठी 'सा रे ग म प' फेम प्रीतम बावडेकर, पार्श्वगायक दर्शन साटम, पार्श्वगायिका सपना हेमण, स्वाती हरवंदे, रिॲलिटी शो फेम नृत्य समूह तसेच संगीत क्षेत्रातील नामवंत वादकांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. आकर्षक रोषणाई आणि दर्जेदार ध्वनीव्यवस्थेमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

यावेळी सफाई कर्मचाऱ्यांसाठी रॅपिड फायर या मनोरंजनात्मक खेळाचेही आयोजन करण्यात आले होते. या खेळातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आल्या. विशेष म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान सफाई कर्मचाऱ्यांनीही रंगमंचावर येऊन गीते सादर केली. त्यामुळे कार्यक्रमाला अधिक उत्स्फूर्त स्वरूप प्राप्त झाले. दरम्यान, स्वच्छता दूत तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# महापालिका मुख्यालयात महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महापालिका मुख्यालयासमोरील उद्यानातील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी उपायुक्त स्वरूप खारगे, सहायक आयुक्त बाळाराम रातांबे, सामान्य प्रशासन विभागाच्या प्रमुख कीर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी उपस्थित होते.

# खारघरमधील नवरात्र उत्सव, गरबा महोत्सव पोस्टरचे अनावरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी प्रणित मधू पाटील प्रतिष्ठान यांच्या वतीने यंदा खारघरमध्ये भव्यदिव्य 'खारघरची आई' नवरात्र उत्सव आणि 'नमो गरबा महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. प्रभाग समिती सभापती मधू पाटील यांच्या संकल्पनेतून प्रथमच आयोजित करण्यात येणाऱ्या या महोत्सवामुळे खारघर परिसरात नवरात्रोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. या भव्य महोत्सवाच्या पोस्टरचे अनावरण भाजपचे प्रदेश चिटणीस तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

यावेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक प्रवीण पाटील, डॉ. सावता देवरे, प्रवीण बेरा, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, सांस्कृतिक सेल अध्यक्ष दीपक ठाकूर, नीरज फडके, अभिजीत सरकार, ध्रुव गजरा, सौरभ यादव, तुकाराम खंडाले, सुभाष दुबे, आशिष लाड, कीर्ती लाड, संजय वाघ, डॉ. किशोर बडगुजर, मधुमिता जेना, शामला सुरेश यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकात्मता, संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविणारा सोहळा असल्याचे सांगितले. 'नमो गरबा' महोत्सवात आकर्षक सजावट, पारंपरिक गरबा-डांडिया, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा आणि भक्तिमय वातावरणाची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने खारघरमध्ये भक्ती, संस्कृती आणि उत्साहाचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार असून हा उत्सव परिसरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

# मराठी शाळा विद्यार्थ्यांच्या संस्कारांची केंद्रे -प्रभाकर जोशी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी शाळा या केवळ ज्ञान देणाऱ्या संस्था नसून विद्यार्थ्यांच्या संस्कारांची केंद्रे आहेत. त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला मिळणारी प्रत्येक छोटीशी मदत ही त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाची ठरते, असे प्रतिपादन भाजपचे कार्यकर्ते व समाजसेवक प्रभाकर जोशी यांनी केले.

सेवा सहयोग फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने रायगड जिल्हा उच्च प्राथमिक केंद्रशाळा, तलोजे पाचनंद येथील सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात प्रभाकर जोशी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यार्थ्यांना देण्यात आलेली स्कूल बॅग आणि शैक्षणिक साहित्य ही केवळ वस्तू नसून त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला दिलेली छोटीशी साथ आहे. विद्यार्थ्यांनी



या सुविधांचा योग्य उपयोग करून मनापासून अभ्यास करावा आणि आपल्या शाळेचे, पालकांचे व समाजाचे नाव उज्ज्वल करावे," असेही जोशी यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी सेवा सहयोग फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले.

कार्यक्रमाला मधुकर गरुडे, हसनेण पटेल, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष किशोर कांबळे, सामाजिक कार्यकर्ते विक्रम गायकवाड, रियाज पटेल, मुख्याध्यापक शंकर ठाकूर, सर्व शिक्षकवृंद तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. सेवा सहयोग फाउंडेशनच्या वतीने मराठी शाळांच्या गरजा जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणाद्वारे शाळांमधील पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, अभ्यासिका तसेच विविध पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप, करण्यात आले.

# करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत स्वच्छता अभियान उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायत, जेष्ठ नागरिक ग्रुप करंजाडे, व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने २ आक्टोबर रोजी सेक्टर ५ ते सेक्टर ३ मध्ये कोठारी स्कुल पर्यंत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

सरपंच मंगेश शेलार यांच्या शुभहस्ते ग्रामपंचायत मध्ये महात्मा गांधी यांच्या फोटोस हार अर्पण करून गांधी जयंती साजरी करण्यात आली. तदनंतर राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत गाऊन स्वच्छता अभियानाला सुरुवात झाली.

सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी सरपंच मंगेश शेलार यांनी ग्रामपंचायतमार्फत विशेष सहकार्य केले. तसेच करंजाडे सुंदर व स्वछ ठेवण्यासाठी करंजाडेचा वसा हाती घेतलेले कैलास शेलार, तसेच भारतीय जनता पार्टीचे सर्व क्रियाशील कार्यकर्ते यांनी सक्रियपणे भाग घेतला. तसेच ग्रामसेविका व ग्रामपंचायतीचे कर्मचारी यांनीसुद्धा आपले योगदान दिले.

कार्यक्रमाची सांगता कोठारी इंटरनॅशनल स्कुल येथे करण्यात आली त्यावेळी सरपंच यांनी असे सांगितले कि दर महिन्याचा एक रविवार ठरवून प्रत्येक सेक्टरला स्वच्छता आभियान राबविण्यात येईल. व नतंर सरपंच मंगेश शेलार यांनी सर्वांचे आभार मानले.



## संपादकीय

# निष्काळजीपणाची किंमत?

शाळा-महाविद्यालयांच्या सहलींसाठी जसे सुरक्षा निकष व नियम आहेत, तसेच खाजगी कोचिंग क्लाससाठीही असले पाहिजेत हे दिवेआगरच्या दुर्घटनेतून समोर आले आहे. निव्वळ व्यवसायवाढीच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना आकर्षित करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करायचे व त्यांच्या सुरक्षिततेची खबरदारी मात्र घ्यायची नाही असे कसे चालेल?

**रायगड जिल्ह्यातील दिवेआगरच्या समुद्रकिनाऱ्यावर पुण्यातील आळंदी येथील खासगी कोचिंग क्लासच्या सहलीला गेलेल्या आठ विद्यार्थ्यांचा गुरुवारी समुद्रात बुडून मृत्यू झाला. ही केवळ हृदय पिळवटून टाकणारी दुर्घटना नाही तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी घटना आहे. आळंदी येथील विनर्स अकॅडमीच्या सहलीसाठी आलेल्या ४८ जणांच्या या समूहात २५ मुले, १७ मुली आणि सहा शिक्षक होते. दुपारी साडेतीनच्या सुमारास पोहण्यासाठी समुद्रात उतरलेल्या आठ विद्यार्थ्यांना पाण्याची खोली, भरती-ओहोटीच्या वेळा आणि समुद्रातील प्रवाहांविषयी काहीही कल्पना नव्हती. ओहोटी असताना ते सर्व जण एकत्र समुद्रात गेले व एकाच ठिकाणी पोहत असताना समुद्रात बुडाले. अवघी १६ ते १८ वर्षे वयोगटातील ही सर्व मुले होती. आठही जणांचे मृतदेह नंतर समुद्रातून बाहेर काढण्यात आले. स्वाभाविकपणे या घटनेत सर्वप्रथम जबाबदारी समोर येते ती सहलीचे आयोजन करणाऱ्या संस्थेची. अल्पवयीन विद्यार्थ्यांना समुद्रकिनारी नेल्यास त्यांना पाण्यापासून सुरक्षित अंतरावर ठेवणे, प्रशिक्षित सुरक्षारक्षक किंवा जीवरक्षकांची व्यवस्था उपलब्ध आहे अथवा नाही याची खातरजमा करणे, धोकादायक भागाची माहिती घेणे आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे ही किमान अपेक्षा कुठेही असते. शिकवणी घेणे हा कोचिंग क्लासचा मुख्य व्यवसाय असला, तरी विद्यार्थ्यांना सहलीला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला की त्यांच्यावर पालकत्वाची जबाबदारीही येते. या घटनेनंतर संबंधित क्लासकडे आवश्यक परवानाही नसल्याचे आढळल्याने आळंदी नगरपरिषदेकडून त्यांच्यावर सील ठोकण्याची कारवाई केली गेली आहे. दिवेआगरच्या किनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी होत असली तरी एमटीडीसीने अद्याप वॉटरस्पोर्ट्सना परवानगी दिलेली नसल्याचे समजते. तरीही पर्यटक समुद्रात उतरल्यास ते जोखमीचे ठरते. जलक्रीडा स्थळास सक्षम प्राधिकरणाची परवानगी आवश्यक असते. येथील किनाऱ्यावरील काही ठिकाणी अलीकडील विकासकामांमुळे समुद्राच्या पाण्याच्या प्रवाहात आणि वाळूच्या रचनेत बदल झाल्याचेही स्थानिकांकडून सांगितले जाते. काही भागांत बांधांवर आदळून परतणाऱ्या पाण्यामुळे वाळूत खोलगट भाग निर्माण झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र याची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे. उत्साहाच्या भरात पर्यटक कुठेही पाण्यात उतरतात. पण समुद्राची खोली, भरती-ओहोटी, प्रवाह किंवा अचानक बदललेली वाळू यांचा अंदाज त्यांना नसतो. त्यामुळे संभाव्य धोक्याची जाणीव करून देणारी यंत्रणा प्रत्येक महत्त्वाच्या समुद्रकिनाऱ्यावर असणे गरजेचे आहे. स्पष्ट सूचना फलक, लाल-पिवळे ध्वज, धोकादायक भागांचे बॅरिकेडिंग, भरती-ओहोटीची माहिती, स्थानिक स्वयंसेवक आणि प्रशिक्षित जीवरक्षक यांची व्यवस्था आवश्यक आहे. दिवेआगरसारख्या लोकप्रिय पर्यटनस्थळासाठी या दुर्घटनेचा आगामी पर्यटन हंगामावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र एका दुर्घटनेमुळे संपूर्ण पर्यटनस्थळ असुरक्षित ठरू नये. सुरक्षित पर्यटन हा पर्यटनवाढीचा महत्त्वाचा घटक असल्याने त्यादृष्टीने तातडीने उपाययोजना व्हायला हवी. त्या आठ मुलांच्या पालकांचे दुःख शब्दांत मांडण्याच्या पलीकडचे आहे. या घटनेचा खरा धडा केवळ शोक व्यक्त करण्यात नाही, तर भविष्यात पुन्हा कुठेही असे अघटित घडू नये म्हणून कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था उभी करण्यात आहे.**

# दुष्काळावर करण्या मात : हवी सर्वांची साथ!



महाराष्ट्रात पावसाचा खंड आणि पिकांचे नुकसान पाहून राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर १नुसार दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहीर करुन त्या भागातील दुष्काळावर मात करण्यासाठी १२ उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकरी नागरिकांना सहाय्य करुन दुष्काळावर मात करायची आहे यासाठी सर्वांची भक्कम साथ अत्यंत महत्त्वाची आहे.

महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हा प्रामुख्याने निसर्गाच्या कृपेवर आधारीत पावसावर अवलंबून आहे. आपल्या राज्यातील शेतीमध्ये कोरडवाहू शेती अधिक प्रमाणात केली जात असल्याचे आपल्या लक्षात येते. शेती ही पूर्णपणे पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना कधी कधी निसर्ग ही कृपादृष्टी करीत नाही व नैसर्गिक संकट निर्माण होते आणि आपला बळीराजा दुष्काळासारख्या संकटात आणि चक्रव्यूहात अडकला जातो. अशीच काही बिकट परिस्थिती यंद्याच्या खरीप हंगामा पासून आपल्या समोर येऊन ठेपली आहे. पावसाचे प्रमाण, पावसातील तूट आणि पाऊस पडण्यातील मोठा खंड यावर आधारित ट्रिगर १ म्हणजे प्रथम कळ लागू करण्यात आली आहे. दुष्काळ जाहीर करण्याच्या प्रक्रियेतील ही पहिली पायरी आहे.

### शेतकऱ्यांना कोणत्या सवलती?

ट्रिगर-१ लागू झाल्यानंतर दुष्काळग्रस्त भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांना विविध सवलती व उपाययोजना लागू करता येतात. मात्र, या सवलती आपोआप सर्वांना मिळतात असे नाही. संबंधित विभागांकडून शासन निर्णयानुसार त्यांची अंमलबजावणी केली जाते. त्यानुसार दुष्काळ सदृष्य पारिस्थिती जाहिर झालेल्या भागात खालीलप्रमाणे १२ उपाययोजना राबविण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.

(१) जमीन महसुलात सवलत : दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना जमीन महसुलात सवलत देण्याची तरतूद आहे. (२) पीक कर्जाचे पुनर्गठन : शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याची प्रक्रिया केली जाऊ शकते. (३) कर्जवसुलीस स्थगिती : शेती कर्जाच्या वसुलीला ठरावीक कालावधीसाठी स्थगिती देता येते. (४) वीजबिलात सवलत : दुष्काळग्रस्त भागातील कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत सवलतीच्या उपाययोजना करता येतात. (५) परीक्षा शुल्कमाफी : दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत किंवा माफी देण्याची तरतूद आहे. (६) टँकरने पाणीपुरवठा : पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करता येतो. (७) चारा उपलब्धता : पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी चारा छावण्या किंवा अन्य उपाययोजना करता येतात. (८) रोजगाराच्या कामांना चालना : दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत गरजेनुसार कामे सुरू करता येतात. (९) पिण्याच्या पाण्याला प्राधान्य : उपलब्ध पाणीसाठ्यातून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची व्यवस्था केली जाते. (१०) पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती : पाणीपुरवठा योजनांच्या तातडीच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले जाऊ शकते. (११) वीजपुरवठा खंडित न करण्याच्या उपाययोजना : दुष्काळग्रस्त भागातील पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाय करता येतात. (१२) पीक नुकसानीसाठी स्वतंत्र मदत : पीक नुकसानभरपाई ही ट्रिगर-१ लागू झाल्याने थेट मिळत नाही. त्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे आणि शासनाने निश्चित केलेले मदतीचे स्वतंत्र निकष लागू राहतात. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी मदत देण्याची स्वतंत्र प्रक्रिया मदत व पुनर्वसन विभागाने नमूद केली आहे.

राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यात दुष्काळ, याचा अर्थ ७५ टक्के महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दुष्काळाची दाहकता अनुभवत असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील ७५ टक्के भागात दुष्काळ जाहीर झाल्याने आता दुष्काळाच्या विविध उपाययोजना जाहीर होऊन त्यांची अंमलबजावणी केली जात आहे. त्यावर पंचनाम्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

### ट्रिगर १ म्हणजे काय?

महाराष्ट्रातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी ट्रिगर-१ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. एखाद्या भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे का, हे तपासण्यासाठी शास्त्रीय निकषांवर आधारित तीन टप्प्यांच्या मूल्यमापनातील हा पहिला टप्पा आहे. महाराष्ट्र शासनाच्या जून २०१८मधील सुधारित शासननिर्णयानुसार मान्सून कालावधीत ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या किंवा पावसाचा प्रदीर्घ खंड पडलेल्या भागात दुष्काळ व्यवस्थापनातील पहिली धोक्याची सूचना म्हणून ट्रिगर-१ लागू केला जातो. ट्रिगर-१ लागू झाला म्हणजे थेट पूर्ण दुष्काळ घोषित होत नाही. यानंतर प्रशासकीय पातळीवर दुष्काळ निवारणाची प्रक्रिया सुरू होते.

ट्रिगर-१च्या अहवालानंतर राज्य शासन प्रभावित तालुक्यांमध्ये पिण्याचे पाणी, चारा छावण्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) कामे आणि शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देण्याचा मार्ग मोकळा करते. शासकीय नियमांनुसार, ट्रिगर-१ची अंमलबजावणी झाल्यानंतर पुढील टप्प्यात उपग्रह निर्देशांक, जमिनीतील ओलावा आणि भूजल पातळी यांसारख्या घटकांचे मूल्यांकन करून ट्रिगर-२ चा आढावा घेतला जातो. त्यानंतर निवडक गावांमध्ये प्रत्यक्ष पीक पंचनामे करून शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीपेक्षा जास्त नुकसान आढळल्यास ती गावे अधिकृतपणे दुष्काळ घोषित करण्यास पात्र ठरतात.

राज्यातील अनेक भागांत पावसाने मोठा खंड दिल्याने अनेक भागांमध्ये पिकांवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून दुष्काळसदृश परिस्थितीचा प्राथमिक आढावा घेतला जात आहे. पाहणी दौरा केला जात आहे. दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून पंचनाम्याचे आदेश देण्यात आले असून त्रिस्तरीय समिती पंचनामे करणार आहे.

दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी बारा उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

### मुख्यमंत्री व शासन बांधावर

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर, धाराशिव,सोलापूर, वाशिम जिल्ह्यांचा दौरा केला. शेतांमध्ये जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली, शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करीत बाधित भागांतील परिस्थिती जाणून घेण्यावर भर दिला आहे.

शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेताना पीक विमा, आपत्ती निवारणाच्या तरतुदी आणि शासनाच्या विविध योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या मदतीचाही विचार केला जात आहे. बाधित भागातील वस्तुस्थिती, पिकांचे नुकसान आणि स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील मदतीबाबत निर्णय घेतले जात आहेत.

शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. संकट कितीही मोठे असो, शेतकरी एकटा नाही. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. फक्त यासाठी सर्वांची साथ हवी आहे.

**-अनिल आलुरकर**, उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, अमरावती



## बदलते तंत्रज्ञान

# चार्जिंग करताना होऊ शकतो मोबाईलचा स्फोट

चार्जिंग करताना मोबाईलचा स्फोट झाल्याचे तुम्ही अनेकदा ऐकले वा वाचले असेल. सगळ्याच मोबाईलला सी टाइप चार्जर लागत असल्याने बऱ्याचदा लोक कोणत्याही चार्जरने मोबाईल चार्ज करतात, पण



असे करणे कदाचित तुमच्यासाठी धोक्याचे ठरू शकते. तुमच्या मोबाईलचा स्फोटही होऊ शकतो. त्यामुळे तुम्ही वापरत असलेला चार्जर ओरिजनल आहे की नाही, तपासून घ्या. ते कसे तपासायचे हेच जाणून घ्या.

मोबाईलचे चार्जर ओरिजनल आहे की नाही हे तपासण्यासाठी केंद्र सरकारने एक ॲप तयार केले आहे. या ॲपचे नाव आहे BIS Care Apps, याच्या मदतीने तुम्ही तुमच्या चार्जरबद्दल जाणून घेऊ शकता.

### BIS Care App काय आहे?

BIS म्हणजे ओनर ब्युरो ऑफ इंडियन स्टॅण्डर्ड. केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या अंतर्गत BIS काम करते. भारतात विकल्या जाणाऱ्या वस्तूंची गुणवत्ता प्रमाणित करणारी संस्था आहे. BIS Care App कोणीही आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करू शकतो.

### चार्जर डुप्लिकेट की ओरिजनल कसे तपासायचे?

सर्वात आधी तुमच्या iOS वा ॲंड्रॉईड मोबाईलमध्ये BIS Care App डाऊनलोड करा.

ॲप सुरू करा. त्यानंतर Verify R No. Under CRS यावर क्लिक करा.

नंतर तुम्हाला दोन पर्याय दिसतील. प्रोडक्ट रजिस्ट्रेशन नंबर किंवा प्रोडक्ट क्यूआर कोड... या दोन्ही पैकी एक निवडून तुम्ही चार्जर ओरिजनल आहे की, डुप्लिकेट हे बघू शकता.

चार्जरचे नाव, प्रोडक्ट कॅटरगरी, चार्जर कोणत्या देशात बनवण्यात आले आहे, इंडियन स्टॅण्डर्ड नंबर आणि मॉडेल इत्यादी तुम्ही चेक करू शकता.

### चार्जरचा रजिस्ट्रेशन नंबर कसा शोधायचा?

जेव्हा तुम्ही नवीन चार्जर खरेदी करता, तेव्हा त्यावर प्रोडक्ट नंबर आणि क्यूआर कोड दोन्ही गोष्टी असतात. या दोन्ही गोष्टी नसतील, तर तो चार्जर डुप्लिकेट आहे. चार्जर खरेदी पावतीवरही रजिस्ट्रेशन नंबर असतो. R####### अशा पद्धतीने हा नंबर असतो.

# समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ



## निमित्त

मराठी कादंबरीकार, कथाकार, मराठी लघुनिबंधाचे आद्य प्रवर्तक आणि साहित्य समीक्षक. स्वामी रामानंद तीर्थ हे हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते, समाजसुधारक, शिक्षण तज्ज्ञ, विद्वान व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव व्यंकटेश भगवान खेडगीकर. त्यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९०३ रोजी कर्नाटकातील सिंदगी येथे झाला. जन्मगावी प्राथमिक शिक्षण घेऊन त्यांनी एका राष्ट्रीय विद्यालयातून मॅट्रिकची परीक्षा दिली आणि पुढे अमळनेर व पुणे येथील महाराष्ट्र विद्यापीठातून इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांसह बी. ए. व 'लोकशाहीचा विकास' हा प्रबंध लिहून एम.ए. पदवी संपादन केली.कृषी उत्पादने

त्यानंतर १९२६मध्ये ना. म. जोशी यांच्या स्वीय सहाय्यकपदी ते रुजू झाले. त्यामुळे आपसुकच ते गिरणी कामगारांच्या लढ्यात सक्रिय सहभागी झाले. त्यांनी त्या वेळी 'या क्षणापासून माझे सर्व उर्वरित जीवन मी मातृभूमीच्या चरणी वाहत आहे, सर्व सुखांचा त्याग करून मी आजन्म ब्रह्मचर्य व्रताचे पालन करीन', अशी प्रतिज्ञा केली आणि आयुष्यभर तिचे पालन केले. सामाजिक जीवनाची पहिली ओळख त्यांना तेथे झाली. सोलापूर येथील कामगार संपात त्यांनी तुरुंगवास देखील भोगला. त्यानंतर त्यांनी हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेत सहा वर्षे मुख्याध्यापक म्हणून काम केले. हिप्परगा येथे असतानाच त्यांनी संन्यास पत्करला आणि 'स्वामी रामानंद तीर्थ' या नावाने ते ओळखले जाऊ लागले. हिप्परगा हे तत्कालीन हैदराबाद संस्थानातील लहानसे गाव. निजामाच्या सरंजामशाही आणि धर्मवेड्या राजवटीची पहिली ओळख स्वामीजींना हिप्परगा येथे झाली. हैदराबाद संस्थानात राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि जनमानसात जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने त्यांनी मोमिनाबाद (आजचे अंबाजोगाई) येथे श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शाळेची स्थापना केली. १४ जानेवारी १९३२ रोजी उस्मानाबादमधील हिप्परगा येथे लखनौस्थित स्वामी नारायण यांच्याकडून संन्यासदीक्षा घेऊन ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. त्यांनी हिप्परगा येथे तत्पूर्वीच १९३० मध्ये राष्ट्रीय विचारांच्या प्रचारार्थ शिक्षण संस्था काढली. याच काळात आ.कृ. वाघमारे आणि अनंतराव कुलकर्णी यांनी हैदराबाद संस्थानच्या जुलूमजबरदस्तीला शह देण्यासाठी हैदराबाद संस्थान महाराष्ट्र संघाची स्थापना केली. १९३१मध्ये केशवराव कोरटकर आणि धर्मवीर वामनराव नाईक यांच्या प्रेरणेने आर्य समाजाची स्थापना केली. स्वातंत्र्योत्तर काळात स्वामीजी लोकसभेचे सभासद म्हणून निवडून आले. हैदराबाद राज्याचे त्रिभाजन करून तेलगू भाषिक आन्ध्र प्रदेशात, कानडी भाषिक कर्नाटकात आणि मराठवाडा महाराष्ट्रात विलीन करावा याचा आग्रह स्वामीजींनी धरला. त्याला यश येऊन मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाला. त्यानंतर तयार झालेल्या द्विभाषिक राज्याचा विरोध करून मुंबईसह अखंड महाराष्ट्राच्या निर्मितीचा स्वामीजींनी आग्रह धरला. त्याला यश येऊन १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. २२ जानेवारी १९७२ रोजी त्यांनी अखेरचा श्वास सोडला. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुम्ही तुमच्या पाण्याची बाटली रोज धुता ना?

शरीरातील पाण्याची पातळी राखणे किती आवश्यक आहे याबाबत वैद्यकीय क्षेत्रामध्ये चर्चा आहे आणि दिवसभरामध्ये किती वेळा पाणी प्यायले पाहिजे याबाबत विविध मदभेद आहेत, पण या सर्वांमध्ये दिवसभर आपली तहान भागवणाऱ्या पाण्याच्या बाटल्या मात्र दुर्लक्षित होत आहेत.



आपल्यापैकी बहुतेक लोक पाण्याच्या बाटल्यांची स्वच्छता आणि सुरक्षितता याकडे दुर्लक्ष करतात.

नोएडा येथील यथार्थ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कन्सल्टंट पेडिएट्रिशियन म्हणून कार्यरत असलेले डॉ. प्रशांत यांनी माहिती देताना सांगितले की, पाण्याच्या बाटलीची नियमित स्वच्छता न केल्यास बॅक्टेरियांची वाढ होते. बंदिस्त आणि ओलसर भागात बॅक्टेरियाच्या वाढीस चालना मिळते. साल्मोनेला (salmonella) आणि E.coli यांसारखे बॅक्टेरिया पाण्याच्या बाटलीमध्ये वाढतात. तसेच पाण्याच्या बाटलीमध्ये बुरशी निर्माण होण्याची शक्यता आहे.

वेळच्या वेळी प्लास्टिकच्या बाटल्या न धुतल्याने दुर्गंधी येऊ शकते. पाण्याच्या बाटलीमध्ये बायोफिल्म (biofilm) नावाचा बॅक्टेरिया विकसित होतो, जो साफ करून नष्ट करणे अवघड आहे.

डॉ. प्रशांत यांनी सुचवले की, वाहत्या पाण्याखाली फक्त बाटली धुण्यापेक्षा रोज साबणाच्या पाण्याने बाटली धुणे जास्त योग्य आहे. पाण्याच्या बाटलीचा वापर जर ज्यूस, सॉफ्ट ड्रिंक यांसारख्या पेयांसाठी केल्यास ती बाटली प्रत्येकवेळी धुवून मगच वापरावी.

जर प्लास्टिकची बाटली तुम्ही वापरत असाल तर हे लक्षात ठेवले पाहिले की, जेव्हा ते गरम पाणी किंवा रासयिनक डिटर्जंट पावडरच्या संपर्कात आल्यास त्यांचे नुकसान होऊ शकते तसेच जर काचेची बाटली वापरत असाल तर ती एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उष्णता सहन करू शकते तसेच स्टेनलेस स्टीलची बाटली कधीकधी ब्लीच आणि क्लोरीनच्या संपर्कात आल्यास रासायनिक प्रक्रिया होते, ज्यामुळे तुमच्या भांड्याच्या आतील बाजूस नुकसान होऊ शकते. तुम्ही पाण्याची बाटली निवडताना काळजी घेणे आवश्यक आहे.

# आमदार चित्राताई वाघ बनल्या अंगणवाडी सेविका!

## चिमुकल्यांमध्ये रमल्या; गाणी, पाढे म्हणत जिंकली बालगोपाळांची मने

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथे 'आंगन मिलन सेवा' अभियानाच्या निमित्ताने भाजप महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा आमदार चित्राताई वाघ यांनी अंगणवाडीतील चिमुकल्यांमध्ये मिसळून त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. मोठ्या पदाची कोणतीही औपचारिकता न ठेवता एका साध्या अंगणवाडी सेविकेप्रमाणे चिमुकल्यांमध्ये रमलेल्या चित्राताई वाघ यांनी उपस्थित बालगोपाळांची मने जिंकली.



शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी आमदार चित्राताई वाघ यांनी प्रथम भाजप महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव श्रेयाताई कुंटे यांच्या नागोठणे येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. त्यानंतर 'आंगन मिलन सेवा' अभियानांतर्गत नागोठणे येथील अंगारआळी आणि उर्दू हायस्कूल परिसरातील अंगणवाडी केंद्रांना भेट देऊन अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच आशासेविकांचा सत्कार केला. तसेच त्यांच्या हस्ते अंगणवाडीतील चिमुकल्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार चित्राताई वाघ यांच्या समवेत रायगड जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील, भाजप महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव श्रेयाताई कुंटे, महिला मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष चित्राताई पाटील, जिल्हा उपाध्यक्षा शर्मिलाताई पाटील, गीताताई पालरेचा, जिल्हा सरचिटणीस हेमाताई मानकर, जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, तालुका महामंत्री आनंद लाड, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अर्पणा सुटे, यशोधरा गोडबोले, प्रीती पाटील, श्रद्धा घाग, प्रणाली शेठ, प्रियांका पिंपळे, रिया कासार, वर्षा जांबेकर यांच्यासह भाजपचे पुरुष व महिला पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंगणवाडीतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना चित्राताई वाघ यांनी सुरुवातीला चिमुकल्यांना 'गुड मॉर्निंग' म्हणत आपुलकीने संवाद साधला. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून 'डाळ भात भाजी', 'जॉनी जॉनी, यस पप्पा', 'ट्विंकल ट्विंकल लिटल स्टार' आदी विविध गाणी म्हणवून घेतली. तसेच चिमुकल्यांकडून वन टू टेन असा इंग्रजी पाढाही म्हणून घेतला.

विशेष म्हणजे, आपण एका मोठ्या राजकीय पदावर आहोत याची कोणतीही जाणीव चिमुकल्यांना होऊ न देता आमदार चित्राताई वाघ अगदी सहजपणे त्यांच्यात मिसळल्या. त्यामुळे अंगणवाडीतील वातावरण आनंदी आणि उत्साहपूर्ण झाले होते. चिमुकल्यांशी संवाद साधताना त्यांच्या चेहऱ्यावरही विशेष आनंद दिसून येत होता.

उर्दू हायस्कूलमधील अंगणवाडी केंद्राला भेट देताना मुस्लिम समाजातील अंगणवाडी सेविका व महिलांनी आमदार चित्राताई वाघ यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी मुस्लिम महिलांनीही केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळाल्याचे सांगत कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. उर्दू माध्यमातील अंगणवाडीतील चिमुकल्यांमध्येही आमदार चित्राताई वाघ मनमोकळेपणाने रमलेल्या दिसून आल्या.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (दि.१) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १९४ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करुन २,००,६००/- रुपये इतका दंड वसूल केला.

# धोकादायक डीपींना सुरक्षाकवच; माणगाव महावितरणचा पुढाकार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील मोर्बा रोड ,दिघी -पुणे मार्गालगत तसेच निवासी संकुलांच्या जवळ असलेल्या वीज डीपीभोवती अखेर लोखंडी सुरक्षा कठडे उभारण्याचे काम महावितरणने हाती घेतले आहे. २८ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या कामामुळे रहिवासी, पादचारी आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



डीपीभोवती वेल्डिंग आणि फेन्सिंगचे काम सुरू असून, या परिसरात लहान मुले खेळत असल्याने बालसुरक्षेचा प्रश्न गंभीर होता. खेळताना चेंडू किंवा अन्य वस्तू डीपीच्या परिसरात गेल्यास मुले धोकादायक विद्युत यंत्रणेजवळ जाण्याची शक्यता होती. त्यामुळे दुर्घटना टाळण्यासाठी केलेली ही उपाययोजना नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत आहे. सुरक्षा कठड्यांमुळे नागरिकांना विद्युत यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राहण्याबरोबरच डीपीमधील कॉइल, तेल किंवा अन्य विद्युत साहित्याच्या संभाव्य चोरीलाही आळा बसण्याची अपेक्षा आहे.

माणगाव शहरातील खांदाड गावात सार्वजनिक शौचालयाजवळ असलेल्या वीज डीपीच्या अगदी लगत घरे, निवासी चाळी आणि नागरिकांची वर्दळ आहे. त्यामुळे या डीपीभोवतीही तातडीने मजबूत लोखंडी कठडे व फेन्सिंग उभारावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यांनी सांगितले की, नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तालुक्यातील विविध ठिकाणी डीपीभोवती सुरक्षा कठडे उभारण्यात येत आहेत. निवासी परिसर, पादचारी व वाहनांची वर्दळ असलेली ठिकाणे तसेच संभाव्य धोकादायक डीपींना प्राधान्य दिले जात आहे.

# भाजपकडून महड, आपटी येथे स्वच्छता अभियान

**खालापूर: प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवेनिमित्त १७ सप्टेंबर ते १७ऑक्टोबर या कालावधीत देशभरात स्वच्छता अभियान राबवले जात आहे.याच मोहिमेचा भाग म्हणून भाजपा खालापूर पूर्व मंडळाकडून २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता प्रसिद्ध श्री वरदविनायक मंदिर, महड येथे भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच भाजपा खालापूर तालुका महिला मोर्चाच्या वतीने आपटी येथे स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत आणि सेवा संकल्प अभियानात खालापूर भाजपचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यामध्ये सरचिटणीस रविंद्र पाटील, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष नागेश पाटील, आध्यात्मिक आघाडी जिल्हा संयोजक काशीनाथ पारठे, मनीष खवळे, प्रसाद पाटील, विशाल लोते, आबा देशमुख, मोहन घाडगे, जयेश पाटील, जयेंद्र पाटील, प्रसाद देशमुख, मयुर पाटील, दत्ताराम पाटील, भगवान गणेशकर, विशाखा देशमुख, लवेश कर्णुक; तर आपटी येथे महिला मोर्चा खालापूर तालुका अध्यक्ष श्वेता मनवे, सरपंच कामिनी पांडवे, माजी सरपंच ज्योती दिनेश मोरे, ललिता पांडवे, शीतल लहाने, जयश्री लहाने, समता ग्रामसंघ उपाध्यक्ष अनिता मोरे, मयूर गायकर, विराज मोरे, राजू गोरे, आरती पांडवे, शीतल पांडवे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.





# उल्हास नदीचे गढूळ पाणी नळपाणी योजनांसाठी बनले डोकेदुखी

**कर्जत : प्रतिनिधी**

उल्हास नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या नळपाणी योजना या सध्या संकटात आल्या आहेत. मध्यंतरी मावळात झालेली ढगफुटी मुळे गेली काही दिवस उल्हास नदीचे पाणी गढूळ बनले आहे. या गढूळ पाण्यामुळे नळाद्वारे जाणारे पाणी देखील गढूळ जात असून गढूळ पाणी मोठी समस्या बनली आहे.



मागील काही दिवस मावळात आणि कर्जत तालुक्याच्या डोंगर भागात ढगफुटी सदृश पाऊस होत आहे.त्याचा मोठा परिणाम उल्हास नदीचे पाणी गढूळ झाले आहे. ढगफुटी सदृश पावसामुळे नदीचे पाणी गढूळ झाले असून प्रामुख्याने डोंगर रांगेत अशा प्रकारची ढगफुटी होताना दिसत आहे. कर्जत तालुक्यात तीन चार ठिकाणी अशी ढगफुटी शेतकऱ्यांनी अनुभवली असून ढगफुटी सदृश पावसामुळे नद्यांमधून वाहत येणारे पाणी हे गढूळ बनते. त्यात कर्जत येथून पुढे ठाणे जिल्ह्यात जाणारी उल्हास नदी गढूळ पाण्यामुळे प्रसिद्ध झाली आहे. सर्वत्र गढूळ पाण्याची चर्चा सुरु असून कर्जत तालुक्यातील बहुतांश नळपाणी योजना या उल्हास नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. या नळपाणी योजना मधून नळाद्वारे घरोघरी जाणारे पाणी गढूळ जात असल्याने गढूळ पाण्याची मोठी समस्या आहे.

माथेरान आणि नेरळ सारख्या मोठ्या नळपाणी योजना उल्हास नदीच्या पाण्यावर असून कर्जत शहराची नळपाणी योजना पेज नदीवर अवलंबून आहे. मोठ्या नळपाणी योजनांचे जल शुद्धीकरण केंद्र कार्यान्वित असून गढूळ पाण्याची समस्या काही प्रमाणात कमी आहे. मात्र तालुक्यातील ग्रामीण भागातील नळपाणी योजना यांच्याकडे जल शुद्धीकरण केंद्राचा अभाव आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी अनेक उपाय अवलंबवावे लागत आहेत.ही बाब जनतेच्या आरोग्यासाठी धोकादायक बनली आहे. उल्हास नदीच्या गढूळ पाण्यावर जनतेला आपल्या आरोग्यासाठी पुढाकार घ्यावा लागणार आहे. गढूळ पाणी ही संपूर्ण कर्जत तालुक्यासाठी समस्या बनली आहे.

# पोलादपूरनजीक लॉजमध्ये पोलिसाची आत्महत्या

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत सडवली फाट्यासमोरील काळकाई हॉटेलच्या मागच्या बाजूला जोगळे लॉजमध्ये गेल्या दोन दिवसांपासून मुक्कामी आलेल्या सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील भुईंज गावातील वाहतूक पोलीसाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली.

पुणे-बंगळुरु महामार्गावरील भुईंज गावातील वाहतूक पोलीस संतोष रामचंद्र नलावडे हा काही घरगुती कारणावरुन ३० सप्टेंबरला पोलादपूर तालुक्यातील काळकाई हॉटेलच्या मागील भागात असलेल्या जोगळे लॉजमध्ये मुक्कामी आला होता. शुक्रवारी दिनांक २ ऑक्टोबरला सकाळी त्याला आंघोळीसाठी पाणी देण्यासाठी गेलेल्या जोगळे लॉजमधील कर्मचाऱ्याला रुम नंबर चारचा दरवाजा आतून बंद केलेला जाणवल्यावर त्याने हाका मारल्या व दरवाजा लगतच्या खिडकीची काच सरकावून खोलीत डोकावले. यावेळी सिलींग फॅनला दोरीने गळफास लावून तो मृतावस्थेत उभा असल्याचे दिसून आले.

यावेळी तातडीने पोलादपूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधून घटनेची माहिती देण्यात आली. यावेळी पोलादपूर पोलीस ठाण्यातील उपनिरिक्षक सतीश पवार यांनी घटनास्थळी पाहणी करून मृताच्या नातेवाईकांना फोन करून कळवले. नातेवाईक पोहोचल्यानंतर रुम नंबर चारचा दरवाजा उघडून प्रेत खाली उतरविण्यात आले. यावेळी महाड उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप काळे आणि पोलादपूरचे सहायक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांनी घटनास्थळी पाहणी केली.

# खंडाळा घाटात पुण्यातील व्यक्तीचा संशयास्पद मृत्यू

**लोणावळा : रामप्रहर वृत्त**

मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील खंडाळा घाटात बॅटरी हिलजवळ एका अज्ञात पुरुषाचे प्रेत आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. लोणावळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत व खंडाळा घाटात ही घटना घडली असून, प्राथमिक तपासात सदर मृतदेह पुण्यातील पिंपळे गुरव येथील रहिवासी जगदीश काचा यांचा असल्याचे निष्पन्न झाले आहे. घटनास्थळावरील परिस्थिती पाहता हा आत्महत्या मृत्यूचा प्रकार असण्याची शक्यता वर्तवली जात आहे आहे. मात्र पोलिसां कडून अद्याप याबाबत अधिकृत माहिती मिळाली नाही

रेल्वे प्रशासनाला ट्रॅकजवळ मृतदेह पडल्याची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ लोणावळा पोलिसांना पाचारण केले. लोणावळा पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने स्थानिक मदत यंत्रणांना पाचारण केले. 'हेल्प फाउंडेशन'च्या आपत्ती व्यवस्थापन सदस्यांनी मृतदेह अत्यंत शिताफीनेबाहेर काढला.

# सेवा पंधरवड्यानिमित्त खोपोलीत स्वच्छता अभियान

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी खोपोली शहराच्या वतीने खोपोली शहरातील अमरधाम स्मशानभूमीत सेवा पंधरवडा निमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



या अभियानाचे उद्घाटन उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात २५ वर्षे पूर्ण होत आहे या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या दरम्यान सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आले आहे या पार्श्वभूमीवर आज स्मशानभूमी स्वच्छता अभियान राबविण्यात येत असल्याचे सांगितले. सर्व शहरभर अशा स्वरूपाचे कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचेपण त्यांनी सांगितले.

यावेळी शहर अध्यक्ष अजय इंगुळकर सरचिटणीस विनायक माडपे, विकास नाईक, भाजप अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष मोहसिन शेख, मितेश शहा, नगरसेविका अश्विनी अत्रे, साठे, राजन शेटे युवा मोर्चाचे अध्यक्ष डॉ निकेत पाटील याचबरोबर इतर कार्यकर्ते यांनी या अभियानात भाग घेतला.


## जाहीर नोटीस

मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,
मु. अलिबाग यांचे न्यायालयात
(रायगड, रत्नागिरी जिल्हा)
मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी / ६५/२०२६

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
पत्ताः ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती
मंदिरा जवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } वादी

**विरूध्द**

१) सौ. आयेशा आलीम शेख
पत्ता : हनुमान मंदिराजवळ,
नेरळ खांडा, अन्जाप, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१

३) सौ. हर्षला अनिल मते
पत्ताः घर नं. ११३३, खांडा नेरळ,
अंजाप, नेरळ, विद्या मंदिर रोड, न्यू पोस्ट ऑफिस जवळ,
नेरळ, ता. कर्जत, जि- रायगड ४१०१०१ } प्रतिवादी

दावा रूपये ४६,०२४

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १६/११/२०२६ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११:०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १/१०/२०२६ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ताः सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या. अलिबाग कॅपस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टँड समोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय,**
**मु. अलिबाग रायगड व रत्नागिरी जिल्हा**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी **श्री. विलास जगन्नाथ कांगणे व इतर १२** यांच्या मालकीच्या सिडकोमार्फत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पुनर्वसन व पुनस्थापना योजनेअंतर्गत (२२.५ टक्के योजना) त्यांना वाटप झालेल्या खालील वर्णनाच्या भुखंडाचे सर्व हक्क, अधिकार व फायदे आमचे अशिलांचे लाभांत कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्याचे ठरविले आहे. सदरहू भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे,

**भुखंडाचे वर्णन**
**नोड-उलवे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| फाईल नंबर | नोड | सेक्टर क्र. | भुखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| ४३/२०२३ आणि DRN-७९ | उलवे | २८ | ९३ | १६०० चौ. मीटर |

वरील भुखंडाबाबत अन्य कोणीही व्यक्ती अगर संस्था यांचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, विकी, गहाण कर्ज, ताबा, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, साठेकरार फरोक्त, वारसाहक्क, दावा, वगैरे अशा संदर्भात कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ (एकविस) दिवसांचे आत दाव्याशी संबधीत असलेल्या दस्तऐवजाच्या प्रमाणित केलेल्या प्रतींसहीत खालील पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने लेखी हरकती दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे

वरिल मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत वा तकार न आल्यास सदरहू भुखंड मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा अगर हितसंबंध नाही, असे समजून आमचे अशिल सदरहू भुखंडाच्या विकी व हस्तांतरणाचा पुढील व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तकारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : सि.बी.डी. बेलापूर**
**तारिखः ०२/१०/२०२६**

**सही/-**
**ॲड. सुभाष किसन वास्कर**
**(वकील)**

कार्यालय : १२०१, कॅसाब्लँका, प्लॉट नंबर ४५,
सेक्टर ११, रेल्वे स्टेशन समोर, सि.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
मोबाईल : ८१६९४२६२९६

## कुलमुखत्यारपत्राचा दस्त रद्द झाल्याबाबतची

**जाहीर नोटीस**

याद्वारे तमाम जनतेस व संबंधितांना कळविण्यात येते की,

आमच्या अशिल सौ. वैशाली जितेंद्र माळी, राहणार फ्लॅट क्र. ५०२, माऊली दर्शन को.ऑ. हो. सोसायटी, प्लॉट नं.९ सेक्टर १५, खारघर यांच्या वतीने, त्यांनी दाखवलेल्या कागदपत्रांवरून आणि त्यांच्या सूचनेनुसार जाहीर नोटीस पुढीलप्रमाणेः

आमच्या अशिलांच्या आणि त्यांचे पती श्री. जितेंद्र शिवदास माळी यांचे संयुक्त मालकी हक्कात पुढील वर्णनाची सदनिका मिळकत आहे. त्या मिळकतीच्या संदर्भात आणि अन्य मिळकतींच्या संदर्भात आमच्या अशिलांकडून त्यांच्या नकळत नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्र करून घेतले आहे. ती पावर ऑफ ॲटर्नी रद्द करणे हा प्रस्तुत जाहिर नोटीसाचा विषय आहे.

| फ्लॅट क्र | प्लॉट क्र | सेक्टर क्र | इमारतीचे नाव | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १०१ | ६७ | २६ | लक्ष्य होम्स सी.एच.एस | ३०५.६१ चौ.फूट + १७ चौ. फूट टेरेस |

या वर नमुद सदनिका मिळकतीबाबत दिनांक १५/०१/२०१८ रोजी दस्त अनुक्रमांक ४५८/२०१८, सह दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल -१ यांचे कार्यालयात, नोंदणीकृत करण्यात आलेला कुलमुखत्यारपत्राचा दस्त आमच्या अशिल पूर्णतः रद्दबातल करीत आहेत. सदर बेकायदेशीर पॉवर ऑफ ॲटॉर्नीचा, आमच्या अशिलांच्या नकळत जर यापुर्वी गैरवापर झाला असेल, तो गैरवापरही याउपर तथ्यहीन आणि अमंलनीय ठरेल, सदर जाहीर नोटीसद्वारे आमचे अशिल जाहीर करीत आहेत की, कुलमुखत्यारधारी श्री. जितेंद्र शिवदास माळी यापुढे त्यांचे कुलमुखत्यारी राहिलेले नाहीत. सदरहू नोंदणीकृत POA पुर्णपणे रद्दबातल झाली असून, भविष्यात या दस्ताचा वापर कायदेशीर ठरणार नाही, याची सर्व संबधितांनी दखल घ्यावी. दस्ताचा बेकायदेशीर वापर आमच्या अशिलांवर बंधनकारक नसेल हे तमाम जनतेस कळावे.

**दिनांकः ०३/१०/२०२६**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**ॲड. माधुरी राजन थळकर**
शॉप नं.१, तळ मजला, प्लॉट नं. ९८/२
साईप्रसाद सीएचएस, स्वामी नित्यानंद मार्ग,
पनवेल ४१०२०६, मो.न. ९८९२९५५००१

# उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय!

## भूसंपादन आणि वाढीव नुकसानभरपाई प्रक्रियेत हस्तक्षेप फेटाळला

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या उभारणीसाठी शासनाने संपादित केलेल्या जमिनींच्या नुकसानभरपाईसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. भूसंपादन तसेच वाढीव नुकसानभरपाई निश्चित करण्याच्या प्रक्रियेत सिडकोला हस्तक्षेपाचा अधिकार नसल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने सिडकोचा अर्ज फेटाळला. या निर्णयामुळे योग्य मोबदल्यासाठी न्यायालयीन लढा देणाऱ्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



नवी मुंबईच्या विकासासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. शासन नियुक्त भूसंपादन अधिकाऱ्यांनी निश्चित केलेली नुकसानभरपाई अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. आपल्या पिढ्यानपिढ्यांच्या जमिनी विकासासाठी दिल्यानंतरही योग्य मोबदला मिळावा, यासाठी प्रकल्पग्रस्तांनी वाढीव नुकसानभरपाईच्या मागणीसह मुंबई उच्च न्यायालयात अपील व प्रतिदावे दाखल केले होते.

दरम्यान, या प्रथम अपिलांच्या प्रक्रियेत सिडकोने हस्तक्षेप करत वाढीव नुकसानभरपाई निश्चित करण्याचा अधिकार आपल्यालाही मिळावा, अशा आशयाचा अर्ज न्यायालयात दाखल केला होता. मात्र, या

### प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा

अर्जावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने सिडकोचा हस्तक्षेप अमान्य केला आणि भूसंपादन व वाढीव नुकसानभरपाईच्या प्रक्रियेत सिडकोला अधिकार नसल्याचे स्पष्ट करत अर्ज फेटाळून लावला.

या प्रकरणात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्यावतीने मुंबई उच्च न्यायालयात ॲड. अरुणा कोळी आणि ॲड. गणेश कोळी यांनी बाजू मांडली. सिडकोच्या हस्तक्षेपाच्या अर्जाला विरोध करत भूसंपादन आणि नुकसान भरपाई निश्चितीतील अधिकारांचा मुद्दा न्यायालयासमोर मांडण्यात आला. न्यायालयाच्या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्तांच्या न्यायालयीन लढ्याला महत्त्वपूर्ण बळ मिळाले आहे.

दरम्यान, वाढीव नुकसानभरपाईच्या मुख्य दाव्यांवरील पुढील न्यायालयीन प्रक्रियेकडे प्रकल्पग्रस्तांचे लक्ष लागले आहे. नवी मुंबईच्या विकासासाठी जमिनी देणाऱ्या भूमिपुत्रांच्या हक्कांच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, योग्य नुकसानभरपाईसाठी सुरू असलेल्या संघर्षाला यामुळे नवी दिशा मिळाली आहे, असे ॲड. अरुणा गणेश कोळी यांनी सांगितले.

# बारवई येथे महिलेला चाकूचा धाक दाखवून लुटले

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बारवई येथे चहाच्या टपरीवर असलेल्या महिलेला चाकूचा धाक दाखवून तिच्याकडील सोन्याचे मंगळसूत्र, अंगठी, मोबाईल फोन आणि रोख रक्कम जबरदस्तीने लुटल्याची घटना वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीलगत घडली. या प्रकरणातील एका आरोपीला गुन्हे शाखा कक्ष-३च्या पथकाने अवघ्या चार तासांत अटक केली असून, त्याच्याकडून चोरीचा मोबाईल, गुन्ह्यात वापरलेला चाकू, दोन लोखंडी कोयते आणि काळ्या रंगाची बॅग हस्तगत करण्यात आली आहे. अन्य तीन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मीना कातकरी या बारवई येथील चहाच्या टपरीवर असताना चार आरोपी तेथे आले. त्यांनी कातकरी यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र, अंगठी, मोबाईल फोन तसेच रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेनंतर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच गुन्हे शाखा कक्ष-३च्या पथकाने तपास सुरू केला. चोरीला गेलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात आला.त्यानंतर इंदापूर पोलिसांच्या मदतीने मंगेश देसाई काळे ऊर्फ राहुल कांता राज पवार ऊर्फ मंजू (वय १९) याला ताब्यात घेण्यात आले. तो सध्या सरडेवाडी, इंदापूर येथे राहत असून मूळचा डोमेगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पोलिसांनी आरोपीकडून चोरीचा मोबाईल, गुन्ह्यात वापरलेला चाकू, दोन लोखंडी कोयते आणि काळ्या रंगाची बॅग जप्त केली आहे.

दरम्यान, तपासादरम्यान आरोपीचा पोलीस ठाण्यातील जबरी चोरीच्या गुन्ह्यासह शहापूर पोलीस ठाणे तसेच इचलकरंजी, कोल्हापूर येथील आणखी एका गुन्ह्याशी संबंध असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणातील फरार असलेल्या अन्य तीन आरोपींचा पोलीस शोध घेत असून, पुढील तपास सुरू आहे.

# दुकान फोडून चोरी करणाऱ्यांना खांदेश्वर पोलिसांनी केली अटक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दुकान फोडून चोरी करणाऱ्या चार आरोपींना खांदेश्वर पोलिसांनी अटक करत त्यांच्याकडून चोरीचे नऊ गुन्हे उघडकीस आणले.१२ सप्टेंबर रोजी विजय लक्ष्मी इलेक्ट्रिक अँड हार्डवेअर मालेवाडी स्टॉप सुकापुर या ठिकाणी चोरांनी दुकान फोडून मोबाईल फोन आणि रोख रक्कम चोरी केली होती.



याबाबतचा गुन्हा खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप माने आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक तपास करून एका आरोपीला ताब्यात घेतले त्यांनी आणि त्याच्या साथीदार यांनी मिळून हा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले.

या गुन्ह्यामध्ये एकूण चार आरोपींना अटक करण्यात आली. नहीद आलम मोहम्मद जलाल (राहणार सुकापुर) तजमुल कमरुल खान (राहणार सेक्टर १९ वाशी) अश्फाक असदुद्दीन आलम (वाशी) नाझीम मोहम्मद जलाल शेख (वाशी, सेक्टर १९) नावे आहेत.

त्यांच्याकडून खांदेश्वर येथील चार गुन्हे, पनवेल शहर येथील दोन गुन्हे, रबाळे एमआयडीसी मधील तीन गुन्हे असे नऊ गुन्हे उघडकीस आले. आरोपींवर यापूर्वी तुर्भे, खांदेश्वर, रबाळे, एपीएमसी, विष्णूनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये स्वच्छता अभियानातून महात्मा गांधी जयंती साजरी

**उलवे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबवून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. 'स्वच्छता हीच सेवा' या भावनेतून विद्यार्थी परिषद सदस्य, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाळा परिसरासह उलवे येथील हनुमान मंदिर परिसर आणि गणेश विसर्जन तलाव परिसराची स्वच्छता केली.



महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला दिलेले महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि स्वच्छता ही केवळ एका दिवसाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची दैनंदिन सामाजिक जबाबदारी आहे, हा संदेश विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने या स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले.

या अभियानात विद्यार्थी परिषद सदस्य व विद्यार्थ्यांनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांच्या सहकार्याने शाळेच्या परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर अनावश्यक वस्तू संकलित करून परिसर स्वच्छ केला. त्यानंतर उलवे येथील हनुमान मंदिर परिसराचीही स्वच्छता करण्यात आली. तसेच गणेशोत्सवानंतर गणेश विसर्जन तलाव परिसरात साचलेला कचरा व निर्माल्य संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानात उत्साहाने सहभाग घेत परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे तसेच आपल्या परिसराची स्वच्छता राखणे याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, सामाजिक बांधिलकी, पर्यावरणाविषयी जागरूकता, श्रमप्रतिष्ठा आणि सार्वजनिक जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसोबत प्रत्यक्ष स्वच्छता अभियानात सहभागी होत 'स्वच्छतेसाठी प्रत्येकाचा सहभाग आवश्यक आहे' हा आदर्श निर्माण केला.

# राज्य तृतीयपंथी कल्याण मंडळ बरखास्त करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्रात तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण, कल्याण आणि पुनऊत्थानासाठी महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी व्यक्ती हक्काचे संरक्षण व कल्याण मंडळ (राज्य तृतीयपंथी कल्याण मंडळ) स्थापन करण्यात आले आहे. मात्र, या मंडळाच्या माध्यमातून कोणत्याही सोयी सुविधा समाज कल्याण विभागाकडून दिल्या जात नाहीत. सर्वांना विश्वासात घेऊन ही कमिटी नियोजित करण्यात आली नसल्याचा आरोप करत या कमिटीवर असणाऱ्या एका तृतीय पंथीयाकडून दुजाभावाची वागणूक करून कोणताही लाभ दिला जात नसल्याचा आरोप करीत मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि परिसरातील तृतीयपथीयांनी



अखिल भारतीय किन्नर समाज यांच्यावतीने विविध मागण्यांसाठी बेलापूर येथील कोकण भवन कार्यालयावर धडक दिली. यावेळी मुंबईचे सात मुख्य धर्मगुरू लता नायक, अरुणा नायक, शोभा नायक, हसन नायक, नसीम नायक, ललिता नायक, अख्तर नायक उपस्थित होत्या.

सरकारने तृतीयपंथीयांसाठी स्थापन केलेल्या मंडळामध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप करीत मंडळावर नियुक्त केलेल्या सोनाली चौकेकर तृतीयपंथीने चुकीच्या पद्धतीने कामे दाखवून निधी लाटला असून तिची तात्काळ नियुक्त रद्द करून पदावरून पाठवण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. एका कुणाला विचारात न घेता इतर सातही धर्मगुरूंना समाविष्ट करून नव्याने मंडळाचे रचना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

भारत सरकारने तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी समाज कल्याण विभागाची नेमणूक केली आहे. मात्र, समाज कल्याण विभाग आमच्यासाठी काय काम करत आहे हे आम्हाला अद्याप माहिती नाही. महाराष्ट्रामध्ये २ हजार तृतीय पंथीयांकडे ट्रान्सजेंडर कार्ड आहेत. परंतु लाखोच्या संख्येने असणाऱ्या तृतीयपंथीयांना कार्ड देण्यात दिरंगाई होत असल्याचा आरोप तृतीयपंथी धर्मगुरूंनी केला आहे.

आमच्यामध्ये आम्ही अठरा पगडचे जातीचे लोक आहेत. कोणीही हिंदू, मुस्लिम असा भेदभाव करत नाही. समाज कल्याणच्या वेलफेअर बोर्डमध्ये काही असे तृतीयपंथी आहेत जे समाजामध्ये हिंदू मुस्लिम जाती-जातीमध्ये तेड निर्माण करण्याचे काम करीत आहेत. त्यांच्यावर प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी निवेदनात केली आहे.

तृतीय पंथीयाचे मुंबईचे सात नायक (प्रमुख धर्म गुरु) आहेत. भारतामध्ये सगळ्यांना जात पंचायत आहे तसा आमच्यासाठीही जात पंचायत कायदा आहे. मात्र, काही समाज कंटक लोक आहेत, जे समाजाला वेगळ्या दिशेला घेऊन चालले आहेत. हा प्रकार अत्यंत चुकीचा असून आमच्या समाजामध्ये काही लोक आमच्या लोकांना मारतात, केस कापतात, खंडणी वसूल करतात. त्याला सुद्धा आळा बसला पाहिजे. यासाठी प्रशासनाने तातडीने पावले मागणी केल्याचे तृतीयपंथीयांनी केली आहे.

# गव्हाण विद्यालयात स्वच्छता अभियानातून विद्यार्थ्यांनी दिला स्वच्छतेचा संदेश



**गव्हाण-कोपर : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधानलालबहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

जयंतीनिमित्त विद्यालयात स्वचछता अभियानाचेही आयोजन करण्यात आले.इयत्ता सातवी 'ब'च्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षिका प्रतिज्ञा घरत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या शुभहस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रविंद्र भोईर, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, ज्युनिअरकॉलेज विभागप्रमुख प्रा. संजय उगले, प्रा. सोनटक्के, प्रा. करुणा तांडेल, अर्चना पाटील, रंजीता पाटील,चारुशीला ठाकूर, विशांत ठाकूर, दर्शना म्हात्रे, दयानंद खारकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीउपस्थित होते.

यावेळी इयत्ता सातवीतील वैष्णव देशमुख, सिमरन डाकवे व प्रतीक पवार यांनी मनोगतव्यक्त करत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच स्वच्छतेचे महत्त्वविद्यार्थ्यांना पटवून दिले. देवेंद्र म्हात्रे यांनीही आपल्या मनोगतात दोन्ही महापुरुषांच्या कार्याचे महत्त्वविशद केले.पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी महात्मा गांधींच्या तीन माकडांच्या कथेद्वारे विद्यार्थ्यांना गांधीजींच्या विचारांची आठवण करून देत स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांनी आपले घर, शाळा आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचेआवाहन केले.

यानंतर विशांत ठाकूर व चारुशीला ठाकूर यांनी आरोग्याच्या दृष्टीने हात स्वच्छ धुण्याचे शास्त्रीय पद्धतीने प्रात्यक्षिक करून दाखवले. विद्यार्थ्यांकडूनही ही कृती करून घेण्यात आली.कार्यक्रमानंतर इयत्ता पाचवी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सहकार्याने शालेय परिसरात स्वच्छताअभियान राबविले. पिण्याच्या पाण्याचा परिसर, शाळेची परसबाग, तुळस बाग तसेच शाळेच्या समोरील वमागील परिसराची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी 'स्वच्छ शाळा, सुंदर शाळा'चासंदेश दिला.

# कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राला वीर वाजेकर महाविद्यालयाची भेट

**उरण : वार्ताहर**

शैक्षणिक शिक्षण आणि सामाजिक सेवा यामध्ये दुवा निर्माण करण्याच्या उद्देशाने फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या आरोग्य केंद्र समितीने कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. या भेटीत ग्रामीण आरोग्य केंद्राच्या कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेत विद्यार्थ्यांना आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाच्या बाबी समजावून सांगण्यात आल्या.

विद्यार्थ्यांनी आरोग्य केंद्रातील डॉक्टर आणि कर्मचारी वर्गाशी संवाद साधला. त्यांनी लसीकरण मोहिमा, मातृत्व व बाल संगोपन, आणि सर्वसामान्य आजारांवरील उपचार यांसारख्या सेवा कशा दिल्या जातात हे समजून घेतले.

या भेटीबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर म्हणाले, "अशा प्रकारच्या भेटी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात. ग्रामीण भागातील आरोग्यसेवेच्या महत्त्वाची जाणीव त्यांना होते." या भेटी साठी आयोजन डॉ. झेलम झेंडे यांनी केले, त्यात डॉ. सुजाता पाटील मॅडम, प्रा. देवेंद्र कांबळे आणि प्रा. विशाखा पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.



## विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी थारगाडी चालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. २६ वर्षीय तरुणी खारघर, सेक्टर ३४ येथे राहत असून ३० सप्टेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास बिडी सोमानी स्कूल ते पेठ पाडा मेट्रो स्टेशनकडे चालत जात होत्या. यावेळी अनोळखी इसमाने त्यांचा विनयभंग केला



**पनवेल : माजी नगरसेविका वर्षा नाईक यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी रवींद्र नाईक व कुटुंबीय उपस्थित होते.**

# रायगडात एड्सविरोधी लढ्याला मोठे यश!

## संसर्गाचे प्रमाण ०.१७ टक्क्यांवर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य एड्स प्रतिबंधक संस्था आणि राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून जिल्ह्यात एड्सविषयी जनजागृती, तपासणी, प्रतिबंध व उपचार मोहीम प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. प्रगती अहवाल नुकताच जाहीर करण्यात आला असून त्यातून जिल्ह्यातील एड्सविरोधी मोहिमेला आलेले यश अधोरेखित झाले आहे.



विशेष म्हणजे तपासण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असतानाच संसर्गाचे प्रमाण घटल्याचे चित्र या अहवालातून समोर आले आहे.जिल्ह्यात सर्वसाधारण नागरिकांच्या तपासणीचे उद्दिष्ट १७,४३२ इतके निश्चित करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात तब्बल ४३,५१९ नागरिकांची तपासणी करण्यात आली. उद्दिष्टाच्या तुलनेत जवळपास अडीचपट अधिक काम झाले आहे. गरोदर मातांच्या तपासणीतही उल्लेखनीय कामगिरी झाली असून ११,७५६ तपासण्यांचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात १८,३१४ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली.आणि गरोदर माता मिळून तब्बल ६१,८३३ जणांची तपासणी झाली. त्यापैकी १०३ जणांमध्ये संसर्ग आढळून आला. यात ९५ सर्वसाधारण नागरिक व ८ गरोदर मातांचा समावेश आहे. विशेष म्हणजे २०१४-१५ मध्ये जिल्ह्यातील संसर्गाचे प्रमाण ०.४२ टक्के होते. ते आता ०.१७ टक्क्यांवर आले आहे. तपासणीचा विस्तार वाढत असतानाच संसर्गाचे प्रमाण कमी होत असल्याने जिल्ह्यासाठी ही बाब समाधानकारक मानली जात आहे.

रायगड जिल्ह्यात सन २००२पासून आतापर्यंत एकूण ११,२४२ जणांमध्ये संसर्ग आढळून आला आहे. सुरुवातीच्या काळात संसर्ग झालेल्या व्यक्तींची वेळेत उपचारासाठी नोंदणी होण्याचे प्रमाण कमी होते. सन २००९ मध्ये केवळ २४ टक्के रुग्ण उपचारपूर्व नोंदणीच्या प्रक्रियेत येत होते.मात्र, जनजागृती, समुपदेशन व तपासणीची सुविधा वाढल्यामुळे परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. सन २०२६ मध्ये हे प्रमाण ७८.४२ टयांवर पोहोचले आहे. संसर्गाचे निदान झाल्यानंतर रुग्णांना लवकरात लवकर उपचाराच्या प्रवाहात आणण्यात येत असल्याने त्यांचे आरोग्य टिकवून ठेवण्यास मोठी मदत होत आहे. वेळेत उपचार मिळाल्याने गंभीर गुंतागुंत व मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासही मदत होत आहे.

एड्सग्रस्त रुग्णांवर सुरू असलेल्या औषधोपचाराचा परिणाम किती प्रभावी आहे, हे तपासण्यासाठी विषाणूची संख्या मोजणारी विशेष चाचणी केली जाते. एप्रिल ते जुलै या चार महिन्यांत जिल्ह्यातील १,६७३ रुग्णांची ही चाचणी करण्यात आली.त्यापैकी तब्बल १, ६२६ रुग्णांत म्हणजेच सुमारे ९७ टक्के रुग्णांमध्ये विषाणू नियंत्रणात असल्याचे आढळले. उपचार नियमितपणे घेतल्यास संसर्ग नियंत्रणात ठेवून रुग्णांना दीर्घकाळ सामान्य जीवन जगता येऊ शकते, हा संदेशही यातून जात आहे.

पनवेल तालुक्यात रुग्णांचे प्रमाण सुमारे १० टक्के आहे.वाढत्या शहरीकरणामुळे रुग्णांचे प्रमाण तुलनेने वाढले आहे.मात्र रुग्णांची तपासणी, निदान व उपचार या बाबतीत पनवेल तालुक्याने आघाडी घेतली आहे.

रायगड जिल्ह्यात तीन ठिकाणी विषाणूविरोधी औषधोपचार केंद्रांच्या माध्यमातून सेवा दिली जात आहे. अलिबाग जिल्हा रुग्णालय, लोधिवली येथील धीरूभाई अंबानी रुग्णालय आणि कामोठे येथील एमजीएम रुग्णालय या केंद्रांमधून रुग्णांना उपचार, समुपदेशन व आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जात आहे.या तीनही उपचार केंद्रांवर आतापर्यंत ७,८९० रुग्णांची कायमस्वरूपी नोंद झाली आहे. त्यापैकी ७ ,०९३ रुग्णांवर औषधोपचार सुरू करण्यात आले आहेत. सध्या ४,६४२ रुग्ण नियमितपणे औषधे घेत आहेत. विशेषतः कामोठे येथील उपचार केंद्राची कामगिरी उल्लेखनीय असून तेथील ८२ टक्के रुग्ण उपचाराच्या प्रवाहात कायम आहेत.

## पोलादपूर कोतवाल बुद्रुक येथे विवाहितेची आत्महत्या

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील कोतवाल बुद्रुक गावातील माजी जिल्हा परिषद सदस्याच्या सुनेने गुरुवारी सकाळी राहत्या घरी गळफास लावल्याची घटना तालुक्यात चर्चेचा विषय ठरला. या प्रकरणी मृत महिलेच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून पोलादपूर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद रात्री उशिरा दाखल केली आहे.

कोतवाल बुद्रुक येथील रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मुरलीधर दरेकर यांच्या घरी मुलगा घराबाहेर गेला असताना सुनबाई गार्गी गणेश दरेकर (वय २४, पूर्वाश्रमीची नेहा सदाशिव दळवी) उशिरापर्यंत न उठल्याने त्यांच्या रुमच्या दुसर्‍या चावीने दरवाजाचे कुलूप उघडले असता तिने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून गळफास लावून घेतला असल्याचे दिसून आले. या घटनेनंतर सर्वत्र हळहळ व्यक्त होऊन चर्चा सुरू झाली.

मृत विवाहित महिलेच्या माहेरी खालापूर तालुक्यातील खांबेवाडी अंतर्गत गोळेवाडी येथील नातेवाईकांनी मोठ्या संख्येने कोतवाल बुद्रुक येथे धाव घेऊन भावनातिरेकाने आक्रोश केला. यावेळी महिलेचा भाऊ प्रथमेश शिवाजी दळवी याने पोलादपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

या घटनेनंतर महाड उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप काळे आणि पोलादपूरचे सहायक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांनी सायंकाळी भेट देऊन पाहाणी केली. यावेळी पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात डॉ. जगदाळे यांनी शवविच्छेदन करून मृत्यूबाबत अहवाल तयार करण्याचे काम सुरू केले.

पोलीस उपनिरीक्षक मंगेश मुंडे यांनी मृतदेहाची उत्तरीय तपासणीनंतर तपासकार्य सुरू केले. रात्री उशिरा कोतवाल बुद्रुक येथे मृतदेहावर माहेरच्या व सासरच्या तसेच ग्रामस्थ आणि आप्तपरिवार समाजबांधवांच्या उपस्थितीत अग्निसंस्कार करण्यात आले.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत खोपोलीत रक्तदान शिबिर




**खोपोली : प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत खोपोली नगर परिषदेच्या वतीने महाराजा मंगल कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी स्वतः रक्तदान करून केले.

यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे मुख्याधिकारी पंकज पाटील, आरोग्य विभागाचे गौतम भगळे, बांधकाम सभापती अनिल सानप, नगरसेविका व महिला आघाडीच्या अश्विनी अत्रे, नगरसेविका सानिया शेख, रुकसाना जळगावकर, भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, युवा मोर्चा अध्यक्ष डॉ निकेत पाटील, भाजप कार्यकर्ते संजय करंजकर, विभा फाटक, विमल गुप्ते, निर्मला रजपूत, अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष मोहसिन शेख, शहर उपाध्यक्ष कृष्णा पाटील व अनेक भाजप कार्यकर्ते त्याप्रमाणे नगरपालिका कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तयाचप्रमाणे नगरपरिषद रुग्णालयातील डॉक्टर रिया गायकवाड, नर्स व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वरोसे येथे जेएसएस रायगडतर्फे कापडी पिशवी वाटप, स्वच्छता जनजागृती



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सामान्य नागरिकांमध्ये स्वच्छता, आरोग्य, विविध शासकीय योजना तसेच कौशल्य विकासाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जन शिक्षण संस्थान (जे.एस.एस.) रायगड यांच्या वतीने गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद विभागातील वरोसे येथे 'कापडी पिशवी वाटप व स्वच्छता जनजागृती' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणार्थींना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्लास्टिकचा वापर टाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थित प्रशिक्षणार्थींना कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर आणि संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत विविध स्वच्छताविषयक जनजागृती कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येत आहेत.

'कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार' यांच्या विशेष पुढाकारातून जन शिक्षण संस्थान रायगडमार्फत मागील २१ वर्षांपासून रायगड जिल्ह्यात व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य सुरू आहे. आतापर्यंत ८० हजारांहून अधिक लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली.

स्वचछता, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने वरोसे येथे हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका सारिका सांगळे तसेच प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. उपक्रम उत्साहात पार पडला.

## खालापूर येथे सेवा संकल्प अभियान

**चौक : प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला न्याय, दिलासा मिळत असून त्याचे दैनंदिन जीवनातील गरजेचे काम पूर्ण होत आहेत, असे उद्गार उपसभापती भाई शिंदे यांनी काढले.

खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी खालापूर प्रशासकीय कार्यालयात सेवा संकल्पपूर्ती अभियान राबविले आहे. त्याप्रसंगी लाभार्थी यांना विविध लाभाचे वाटप कार्यक्रमात उपसभापती शिंदे बोलत होते. यावेळी सभापती कृष्णा पारंगे, तहसीलदार अभय चव्हाण, गटविकास अधिकारी संदीप कराड, वरिष्ठ पोलीस प्रदीप रायअण्णा, अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर, गटशिक्षण अधिकारी राजवर्धन, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, महिला व बालविकास अधिकारी विशाल गोताड, उपकार्यकारी अभियंता कुरुंगळे, भूमी अभिलेख अधीक्षक केंद्रे यांच्यासह विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील आणि जनसेवेच्या २५ वर्षांच्या पूर्तीनिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत देशभरात सेवा संकल्प अभियान राबवले जात आहे.खालापूर तालुक्यात देखील सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे.

७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यांच्या सार्वजनिक कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने हे अभियान आयोजित केले आहे. समाजसेवा, राष्ट्रनिर्माण, आरोग्य सेवांचा विस्तार आणि केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजना याची माहिती देणे हा प्रमुख उपक्रम व उद्देश आहे. या सेवापूर्ती अभियानाच्या माध्यमातून आरोग्य व स्वच्छता कार्यक्रम ग्रामीण व शहरी भागात आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे आणि स्वच्छता अभियानांचे आयोजन खालापूर तालुक्यात करण्यात आले.

शालेय शिक्षण विभागामार्फत "विकसित भारत २०४७" चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा तसेच करिअर कौन्सिलिंग आणि डिजिटल साक्षरता मार्गदर्शन सत्रे शिक्षण विभाग यांच्याकडून घेतले आहे.यावेळी महिला व बालकल्याण खाते अंतर्गत अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला. पोषण योजनांची माहिती देवून अंगणवाडी उत्सव' उत्सव साजरा करण्यात आला. राज्य सरकारच्या अंतर्गत तीस योजनांची माहिती व लाभ देण्यात आला.

## नवरात्रोत्सव मंडळ अध्यक्षपदी निकम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर येथील गांधी चौकातील सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यात महेश निकम यांची अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी सनी विचारे व प्रवीण पांडे, कार्याध्यक्षपदी चेतन पवार, प्रतीक सुर्वे सचिव, सहसचिवपदी अथर्व शिंदे, खजिनदारपदी हर्षवर्धन पवार व सहखजिनदार म्हणून सूरज जगताप यांची निवड करण्यात आली. यावेळी पोलादपूर शहरातील विविध भागातील तरुण तसेच शिवजयंती, गणेशोत्सव व नवरात्रौत्सवातील जुनेजाणते प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

यंदाचा नवरात्रोत्सव अधिक उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि सर्वांच्या सहकार्याने यशस्वीपणे साजरा करण्याचा निर्धार यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष निकम यांनी व्यक्त केला.

## अलिबाग अधीक्षक डाकघर येथे ९ ऑक्टोबरला डाक अदालत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अधीक्षक डाकघर, रायगड विभाग, अलिबाग यांच्या कार्यालयामार्फत दि. ०९ ऑक्टोबर.२०२६ रोजी, दुपारी ठीक दुपारी ०३.०० वाजता अधीक्षक डाकघर, रायगड विभाग, अलिबाग येथे डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे.

रायगड विभागातील डाक सेवेसंबंधित ज्या तक्रारी/समस्या ६ आठवड्यांच्या कालावधीत निकाली काढण्यात आलेल्या नाहीत, अशा टपाल, स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर इत्यादी सेवांशी संबंधित तक्रारींचा डाक अदालतीमध्ये विचार करण्यात येईल.

तक्रारीमध्ये सविस्तर माहिती जसे की तक्रारीचा दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इत्यादी माहिती असणे आवश्यक आहे. इच्छुक ग्राहकांनी आपली तक्रार २ प्रतींमध्ये, अधीक्षक डाकघर, रायगड विभाग, अलिबाग यांच्याकडे दिनांक ०७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पोहोचेल अशा रीतीने पाठवावी. त्रैमासिक होणारी डाक अदालत आता दरमहा होणार आहे.

दि.०९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात येणारी डाक अदालत ही या उपक्रमाची दुसरी डाक अदालत असेल. त्यानंतर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी दुपारी ०३.०० वाजता डाक अदालत आयोजित करण्यात येईल, ज्या महिन्यात पहिल्या समोवारी पब्लिक हॉलिडे येईल त्या महिन्यात दुसऱ्या दिवशी डाक अदालत घेतली जाईल. याचे स्वतंत्र वेळापत्रक दिले जाईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

## पालीत साखरचौथीच्या गणरायाला निरोप

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

साखर चौथीनिमित्त प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या गणरायाला पाली शहर व परिसरात गुरुवारी भक्तिमय वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे जलाशयात विधिवत विसर्जन केले. यावेळी पारंपरिक वाद्यांचा गजर आणि गणरायाच्या जयघोषाने संपूर्ण पाली शहर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेले.



यंदाचे साखर चौथीच्या गणपतीचे विसर्जन डीजेमुक्त पद्धतीने पार पडले. ध्वनिप्रदूषण टाळत भाविकांनी ढोल-ताशे, पारंपरिक वाद्ये आणि भक्तिगीतांच्या साथीने गणरायाच्या विसर्जन मिरवणुका काढल्या. पारंपरिक वाद्यांच्या तालावर निघालेल्या या मिरवणुकांमुळे गणेशोत्सवातील भक्तीमय आणि पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडले.

साखर चौथीच्या गणपती विसर्जनासाठी सकाळपासूनच भाविकांची लगबग सुरू होती. घरगुती तसेच विविध ठिकाणी प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या गणरायांच्या विसर्जनासाठी भाविकांनी पारंपरिक पद्धतीने मिरवणुका काढल्या. ढोल-ताशांचा गजर आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात मिरवणुका विसर्जन घाटाकडे मार्गस्थ झाल्या.

## साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त मुरुडमध्ये विविध स्पर्धांना प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथे साखर चौथ गणपती निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यावर्षीच्या साखर चौथ गणेशोत्सवाचे विविध उपक्रम शाळेचे पर्यवेक्षक प्रतिक पेडणेकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून साकारण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा तसेच वक्तृत्व व लेखनकौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने त्यांच्या मार्गदर्शनाखाली वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, गीत गायन स्पर्धा आयोजन करण्यात आले.



वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध विषयांवर प्रभावीपणे आपले विचार मांडले. निबंध स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी सुंदर, कल्पक व आशयपूर्ण लेखन करून आपली प्रतिभा सादर केली.त्याचप्रमाणे गायन स्पर्धा घेऊन स्थानिक विद्यार्थ्यांना पुढे वाटचाल मिळावी यासाठी प्रयत्न केले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळाली.या संपूर्ण उपक्रमासाठी मुख्याध्यापिका अर्चना खोत यांचे सहकार्य लाभले . तसेच सहजीवन विद्यामंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे यांनी या उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

पर्यवेक्षक प्रतिक पेडणेकर यांच्या नियोजनबद्ध पुढाकारामुळे साखर चौथ गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहजीवन विद्या मंडळ अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ सदस्य,मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# भारतीय बॉक्सर्सचा 'गोल्डन' पंच!

## लव्हलिना, परवीन आणि अंकुशने जिंकले सुवर्णपदक

**नागोया : वृत्तसंस्था**

भारतीय बॉक्सर्सने आशियाई क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. लव्हलिना बोरगोहेन, परवीन हुडा आणि अंकुश पांघल यांनी वेगवेगळ्या गटांमध्ये ही सोनेरी कामगिरी केली.

लव्हलिना बोरगोहेनने महिलांच्या ७५ किलो वजनी गटात चीनच्या झीयी बाओचा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. २०२२मध्ये हांगझू येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत लव्हलिनाने याच वजनी गटात रौप्यपदक जिंकले होते. यावेळी तिच्याकडे मागील कामगिरीत सुधारणा करण्याची संधी होती आणि तिने ती साध्य केली.

लव्हलिनाच्या या विजयामुळे तिच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत आणखी एका मोठ्या कामगिरीची नोंद झाली आहे.



आसाममध्ये जन्मलेल्या लव्हलिनाने टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले असून ती माजी जागतिक चॅम्पियनशिप सुवर्णपदक विजेतीही आहे.

लव्हलिनाच्या पाठोपाठ बॉक्सर परवीन हुडाने ६५ किलो वजनी गटात पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या चेन निएन-चिनला पराभूत करत यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला बॉक्सिंगमधील दुसरे सुवर्णपदक मिळवून दिले.

परवीनसाठी हे सुवर्णपदक विशेष महत्त्वाचे आहे. मागील आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने कांस्यपदक जिंकले होते, मात्र त्यानंतर हे पदक तिच्याकडून काढून घेण्यात आले होते. डोपिंग चाचणीसाठी आवश्यक असलेली आपली लोकेशन माहिती न दिल्यामुळे तिच्यावर २२ महिन्यांची बंदी घालण्यात आली होती. यामुळे तिचा ऑलिम्पिक कोटाही रद्द करण्यात आला होता.

या घटनेनंतर परवीनला मोठा धक्का बसला होता. ती मानसिकदृष्ट्याही खचली होती, परंतु मानसोपचारतज्ज्ञांची मदत, ध्यानधारणा आणि कठोर मेहनतीच्या जोरावर तिने पुन्हा दमदार पुनरागमन केले. आता त्याच आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत परवीनने आपल्या पुनरागमनावर शिक्कामोर्तब केले आहे.

भारतीय युवा बॉक्सर अंकुश पांघलने बॉक्सिंगच्या ८० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले आहे. लव्हलिना बोर्गोहेन आणि प्रवीण हुड्डा या दोघींनी महिला बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक जिंकल्यानंतर अंकुशनेही 'गोल्डन' पंच लगावत भारतासाठी बॉक्सिंगमधील सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक पूर्ण केली. त्याने दक्षिण कोरियाच्या किम मिन-सोंगचा पराभूत करत सुवर्णपदकावर नाव कोरले.

# कुस्तीपटू सुजीत कलकलची पिछाडीवरून 'सुवर्ण' मुसंडी

**नागोया : वृत्तसंस्था**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा युवा मल्ल सुजीत कलकल याने इतिहास रचला आहे. शुक्रवारी झालेल्या पुरुषांच्या ६५ किलो फ्री-स्टाईल कुस्तीच्या अंतिम सामन्यात सुजीतने ताजिकिस्तानच्या अब्दुलमजिद कुदीवचा थरारक पराभव करत भारतासाठी सुवर्णपदक पटकावले.

अंतिम सामन्यात एक वेळ अशी होती की, सामना संपायला अवघा १ मिनिट ४० सेकंदांचा वेळ बाकी होता आणि सुजीत २-९ असा तब्बल सात गुणांनी मागे पडला होता, परंतु हार न



मानता सुजीतने एकामागून एक जबरदस्त 'टेकडाऊन' दाव मारत सामन्याचे चित्रच पालटून टाकले. सामना संपायला अवघे ११ सेकंद शिल्लक असताना त्याने विजय खेचून आणला आणि सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. २०१८च्या जकार्ता आशियाई स्पर्धेत बजरंग पुनिया आणि विनेश फोगट यांनी मिळवलेल्या सुवर्णपदकानंतर कुस्तीतील भारताचे हे पहिलेच आशियाई सुवर्णपदक ठरले आहे.

सुजीतने जिंकलेले हे सुवर्णपदक त्याच ६५ किलो वजनी गटात आले आहे, ज्यावर यापूर्वी बजरंग पुनिया आणि योगेश्वर दत्त यांनीही आपली छाप सोडली होती. योगेश्वरने २०१४ आणि बजरंगने २०१८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत याच वजनी गटात सुवर्णपदक जिंकले होते, तर बजरंगने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ६५ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले होते.



# शालेय शुटींग स्पर्धेत सुप्रिता सुबुद्धीला सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषद आणि मुंबई जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित विभागीय शालेय शुटींग स्पर्धा ठाणे येथील प्रिसीहोल शुटींग रेंज येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत इंडियन मॉडेल अँड जुनियर कॉलेजची विद्यार्थिनी सुप्रिता सुबुद्धी हिने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत अंडर १७ वर्ष गर्ल्स एअर पिस्तूलमध्ये सुवर्णपदक पटकाविले.

सुप्रिताला आंतरराष्ट्रीय ज्युरी जितेश कदम यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. ती सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लब रायगड रेंजवर प्रशिक्षक राष्ट्रीय नेमबाज किशन खारके आणि राष्ट्रीय नेमबाज व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अलंकार कोळी तसेच विश्वजीत यांच्याकडे नेमबाजीचे प्रशिक्षण घेत आहे. या यशाबद्दल शालेय प्राचार्य व संचालक यांनी सुप्रिताचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# धीरज-कुमकुमने रचला इतिहास!

**नागोया : वृत्तसंस्था**

आशियाई खेळ २०२६मध्ये भारताच्या तिरंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत नवा इतिहास रचला आहे. भारतीय तिरंदाज धीरज बोम्मदेवरा आणि कुमकुम अनिल मोहोद यांनी मिश्रित रिकर्व्ह संघ स्पर्धेत भारताला प्रथमच रौप्यपदक मिळवून दिले आहे. अतिशय चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय जोडीला चीनच्या झू जिंगयी आणि ली मेंगची यांच्याकडून ३-५ असा पराभव पत्करावा लागला, ज्यामुळे सुवर्णपदक थोडक्यात हुकले.

सामन्याची सुरुवात चीनने आक्रमक व दमदार पद्धतीने केली. पहिल्या दोन सेटमध्ये चीनने आपली पकड मजबूत करत आघाडी घेतली, मात्र तिसऱ्या सेटमध्ये भारतीय जोडीने जोरदार पुनरागमन करत सामन्यात उत्तम रंगत आणली. भारताला अखेर ऐतिहासिक रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

# जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील रॉयल गार्डन मंगल कार्यालयामध्ये बुधवारी क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अलिबाग यांच्या माध्यमातून हुतात्मा हिराजी पाटील ज्युनियर कॉलेज कडाव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भगवान धुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या स्पर्धेला कर्जत पं.स. सभापती नमिता घारे, तहसीलदार धनंजय जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, उपसभापती चित्रा ठाकरे, जि.प.चे समाजकल्याण सभापती नारायण डामसे, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, जि.प. सदस्य बाबुशेठ घारे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मारुती आडकर, प्राचार्य मनीषा बैकर उपस्थित होते.



स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या विविध वजनी गटांत प्रणित अमोल कुंभार, अंश गणेश घडशी, दर्पण परसराम शिंगे, सुशील रुपेश पावशे, आर्यश श्रीकृष्ण कोळी, श्रेयस चंद्रकांत शिंदे, आश्लेष सुभाष पाटील, राज महेश पाटील, लव्य कमलेश जैन आणि राजू भक्त यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. मुलींमध्ये आस्था सुनील नडवीरमणी, त्रिशा सुनील कांबळे, सौम्या धनेश थळी, काव्या निशांत म्हात्रे, लावण्या परसराम शिंगे, देवांशी शेंद्रे, रिमझिम लल्लन शर्मा, दुर्वा जयवंत ठाकूर यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.

१७ वर्षांखालील फ्रीस्टाइलमध्ये मुलांच्या विविध वजनी गटांत अतिश दिनेश राजभर, करण राजेश कातकरी, साईराज सुनील बालवडकर, अमित अंकुश ढेबे, सार्थक पांडुरंग खताते, प्राण जयेंद्र भगत, दुर्वेश लवलेश पाटील, राय भावेश शशी, ओंकार सुनील जोशी, यश दिनेश मढवी यांनी प्रथम क्रमांक संपादन केला. मुलींमध्ये काव्या राजेंद्र मरागजे, काजल प्रवीण कहार, स्वाती मधुकर हनुमंते, साक्षी सुनील मुसळे, राणी ईदल शहा, संस्कृती रवींद्र लबडे, क्षितिजा जगदीश मरागजे, श्रावणी रमेश जाधव, प्रणिती भरत शिंदे, समृद्धी शिवाजी लोभी यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

१७ वर्षांखालील ग्रीको रोमनमध्ये मुलांच्या विविध वजनी गटांत रिषभ राजेंद्र महाडिक, जित जितेंद्र भगत, सोहम राजेंद्र गायकवाड, वृत्विक सुजित शिळदणकर, श्रवण केतन म्हात्रे, अभिजीत धर्मेंद्र पांडे, निसर्ग मंगेश पाटील, अथर्व संचित वांजळे, शुभम नाबा पोरे यांनी प्रथम क्रमांकाला गवसणी घातली.

१९ वर्षांखालील मुलांच्या फ्रीस्टाइल विविध वजनी गटांत अविनाश विश्वनाथ वाघमारे, स्वराज शिवाजी श्रीखंडे, मिरन गुलाम पोरे, मोहम्मद युनोस मुजफ्फर हुरझुक, वरद सुनील सांगले, वेदांत कुंदन शिंगे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. याच वयोगटात मुलांच्या ग्रीको रोमनमध्ये पार्श्व विकास भगत, आराध्य सुधीर गावंड, मयूर राजेंद्र पडते, राज सुरेश पगार, जसवंत सिंग कडेच्या, काव्य मोदी यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. सर्व विजेत्या कुस्तीपटूंना पदक, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले.

# आगामी वर्ल्डकपमध्ये भारत-पाक भिडणार




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पुढील वर्षी दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबियामध्ये संयुक्तपणे आयोजित होणाऱ्या आयसीसी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ही स्पर्धा २ ऑक्टोबर ते २१ नोव्हेंबर २०२७दरम्यान खेळवली जाणार आहे. या विश्वचषक स्पर्धेत कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या भारत आणि पाकिस्तानच्या संघांना एकाच गटात ठेवण्यात आले आहे. त्यामुळे हे संघ एकदा नव्हे तर तीन वेळा आमने सामने येण्याची शक्यता वाढली आहे.

तब्बल २४ वर्षांनंतर आफ्रिका खंडात क्रिकेट विश्वचषक स्पर्धा रंगणार असून सुमारे ५१ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत १४ संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेत एकूण ५७ सामने खेळवले जाणार आहेत. या स्पर्धेसाठी भारत आणि पाकिस्तानतच्या संघांना अ गटात ठेवण्यात आले असून या गटात गतविजेच्या ऑस्ट्रेलियन संघाचाही समावेश आहे. याबरोबरच अफगाणिस्तान, झिम्बाब्वे आणि एका पात्र संघाचा समावेश असेल.

आगामी क्रिकेट विश्वचषक स्पर्धा एका नव्या फॉरमॅटसह खेळवली जाणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान, तसेच भारत आणि ऑस्ट्रेलियाचे संघ दोन ते तीन वेळा भिडू शकतात. या स्पर्धेत १० ऑक्टोबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात साखळी सामना खेळवला जाणार आहे.

विश्वचषक स्पर्धेच्या आतापर्यंतच्या इतिहासात भारतीय संघ हा पाकिस्तानविरुद्ध अपराजित राहिलेला असल्याने या सामन्यात विजयी घोडदौड कायम ठेवण्याचे आव्हान भारतासमोर असेल. आयसीसी स्पर्धांचा विचार केल्यास भारत आणि पाकिस्तान यांच्यात एकूण २३ सामने खेळवले गेले असून त्यात १९ वेळा भारतीय संघाने बाजी मारली आहे.

# युझवेंद्र चहल प्रथमश्रेणी क्रिकेटमधून निवृत्त



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या आघाडीच्या फिरकीपटूंपैकी एक असलेल्या युझवेंद्र चहलने प्रथमश्रेशी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. चहलने सोशल मीडियावर पोस्ट करून आपल्या निर्णयाची माहिती दिली आहे तसेच आपण प्रथमश्रेणी क्रिकेटमधून तातडीने निवृत्त होत असलो तरी मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये खेळत राहीन, असे चहलने स्पष्ट केले आहे.

३६ वर्षीय युझवेंद्र चहलने ४९ प्रथमश्रेणी सामन्यांच्या ७९ डावात १४८ बळी टिपले आहेत. त्यात सहा वेळा त्याने डावात पाच बळी टिपण्याची किमया साधली, तर एका डावात चार बळी टिपण्याचा पराक्रम त्याने आठ वेळा केला आहे. प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये एका डावात ४४ धावांत सहा बळी ही त्याची सर्वोत्तम कामगिरी होती, तर ९९ धावांत नऊ बळी ही त्याची एका सामन्यातील सर्वोत्तम कामगिरी राहिली आहे.

दरम्यान, लाल चेंडूच्या क्रिकेटमधील माझा प्रवास समाप्त झाला असला तरी मी एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारलेली नाही. देशासाठी खेळण्यासाठीची भूक माझ्या मनात कायम असून क्रिकेटच्या दोन्ही प्रकारांमध्ये पुनरागमन करण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा करेन, असे चहलने स्पष्ट केले आहे.

# क्रिकेटचा खेळ होणार अधिक रोमांचक!

## आयसीसीकडून नियमांमध्ये बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) क्रिकेट खेळाला आणखी रोमांचक, वेगवान आणि पारदर्शक बनवण्यासाठी नियमांमध्ये मोठे बदल जाहीर केले आहेत. हे नवीन नियम १ ऑक्टोबर किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय मालिकांना लागू होतील, मात्र सध्या सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय मालिका जुन्या नियमांनुसारच पूर्ण केल्या जातील. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या भारत विरुद्ध वेस्ट इंडिज एकदिवसीय मालिकेला हे नवीन नियम लागू होणार नाहीत.

आयसीसीने क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटसाठी जाहीर केलेल्या नवीन नियमांनुसार जर एखादा फलंदाज निर्धारित वेळेत चेंडूचा सामना करण्यास तयार झाला नाही किंवा त्याने वेळ वाया घालवला, तर पहिल्या दोन चुकांवर ताकीद दिली जाईल. तिसऱ्यांदा हीच चूक केल्यास क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला पाच पेनल्टी धावा दिल्या जातील.

पुरुष क्रिकेटप्रमाणेच आता महिला आणि ज्युनियर क्रिकेटसाठी चेंडूंच्या वजन आणि आकाराच्या तीन वेगवेगळ्या श्रेणी निश्चित करण्यात आल्या आहेत. यामुळे उत्पादनात सुसूत्रता येईल. मिसफिल्ड आणि ओव्हरथ्रो स्पष्टताः चेंडू अडवताना किंवा तो दुसऱ्या क्षेत्ररक्षकाकडे फेकता (पास करताना) झालेली कोणतीही चूक ही 'मिसफिल्ड' मानली जाईल, त्याला 'ओव्हरथ्रो' म्हटले जाणार नाही.

चेंडू कधी 'डेड' किंवा स्थिर झाला आहे, हे ठरवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आता मैदानावरील पंचांना असेल. चेंडू गोलंदाजाच्या किंवा यष्टीरक्षकाच्या हातात असण्याची अट आता नसेल. फलंदाजाला धावबाद किंवा यष्टीचीत करण्यासाठी क्षेत्ररक्षकाचे चेंडूवर पूर्ण नियंत्रण असणे आवश्यक आहे. केवळ हाताने चेंडूला स्पर्श करणे किंवा चेंडू स्टंपला लागणे पुरेसे मानले जाणार नाही.

कसोटी क्रिकेटमध्ये अपुऱ्या प्रकाशामुळे खेळ खंडित होण्याची समस्या सोडवण्यासाठी दोन्ही संघांच्या परस्पर संमतीने दिवसाच्या सामान्य कसोटी सामन्यांमध्येही गुलाबी चेंडू वापरला जाऊ शकतो. सामन्यात दिवसाच्या शेवटच्या षटकात जर विकेट पडली आणि काही चेंडू शिल्लक असतील, तर खेळ आपोआप संपणार नाही. उरलेले चेंडू त्याच दिवशी टाकून ते षटक पूर्ण केले जाईल.

मर्यादित षटकांच्या सामन्यात गोलंदाजाने चेंडू टाकताना फलंदाजाच्या पायाची जी सुरुवातीची स्थिती असेल, तीच वाईड चेंडूसाठी संदर्भ बिंदू मानली जाईल. फलंदाज नंतर ऑफ स्टंपच्या दिशेने सरकला तरी मूळ स्थितीच गृहीत धरली जाईल. एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांमधील ड्रिंक्स ब्रेकदरम्यान मुख्य प्रशिक्षकांना मैदानावर येऊन खेळाडूंना रणनीती सांगण्याची अधिकृत परवानगी देण्यात आली आहे. टी-२० सामन्यांमध्ये दोन डावांच्या दरम्यानचा वेळ १५ मिनिटांचा निश्चित करण्यात आला आहे, मात्र सामन्यात वेळ वाया गेला असल्यास हा ब्रेक १० मिनिटांपर्यंत कमी केला जाऊ शकतो.

दै. रामप्रहर दिवाळी अंक २०२६
पिढ्यांच्या पाऊलखुणा...
रामप्रहर
दिवाळी अंकांना महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक विश्वात समृद्ध परंपरा लाभली आहे. 'रामप्रहर'नेही ही परंपरा सातत्याने जपली आहे. यंदाच्या दिवाळी अंकासाठी विविध क्षेत्रातील पिढ्यांचा प्रवास हा विषय घेण्यात आला आहे. या मुख्य विषयासोबतच अंकात कथा, कविता, व्यंगचित्रे, लेख, ललित लेखन अशा विविध साहित्यप्रकारांचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे लेखनाची आवड असलेल्या साहित्यिक, लेखकांना या दिवाळी अंकाच्या माध्यमातून आपले साहित्य वाचकांपर्यंत पोहचवण्याची संधी मिळणार आहे.
प्राप्त साहित्याचा यथायोग्य विचार करून दिवाळी अंकासाठी निवड करण्यात येईल.
आपले साहित्य ७ ऑक्टोबरपर्यंत टाइप करून
ramprahar@gmail.com
या ई-मेलवर पाठवावे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com